# शिक्षणाचा खेळखंडोबा

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ११५८०

REFBK-0010230

अप्रबुद्ध

अनुक्रम २४५५४ दि. निर्बंध
क्रमांक ११५५० नों. दि. ३।३।५८

# शिक्षणाचा खेळखंडोबा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
९०२३०
दा. क्र.
मुंबई शाखा

REFBK-0010230

अप्रबुद्ध

प्रकाशक :
**विष्णु केशव पाळेकर**
यमुना निवास, महाल, नागपूर

( सर्व हक्क लेखकाधीन )

मुद्रक :
द. ग. गपचूप
**श्री शिवाजी प्रिंटिंग वर्क्स**
४९५–४९६ शनिवार पेठ, पुणें २

॥ श्री ॥

तेषामेवानुकंपार्थमहमज्ञानजं तमः ।
नाशयाम्यात्मभावस्थं ज्ञान दीपेन भास्वता ॥

अशी घोषणा करणाऱ्या परम कारुणिकाच्या प्रेरणेनें सुचलेले हे चार
सुविचार त्याच्याच चरणीं अर्पण असोत !

— अप्रबुद्ध

# प्रस्तावना

देवाच्या दयेनें ध्यानीं मनीं नसतां भारतांत सत्तांतर झालें. सत्तांतरासारखेंच अकस्मात् भारताचें नंदनवन व्हावें अशी कोणीहि अपेक्षा करणें वेडेपणाचें होतें. परंतु त्या दिशेनें भारताचीं पावलें तरी बिनचूक पडावींत अशी साहजिकच आशा होती. बारा वर्षांनंतर आज देखावा अगदींच वेगळा दिसत आहे. निरनिराळ्या बाबतींत केवढींहि मतांतरें असलीं तरी एक गोष्ट मात्र निर्विवाद अनुभवास येते. पुढें पाऊल पडण्याऐवजीं पिछेहाटच होत आहे. मग वरचा देखावा कसाहि असो. एका गोष्टींत तरी दुमत नाहींच. **सर्वसामान्य भारतीय मनुष्याचा नैतिक दर्जा फारच खालावला आहे.** असें कां व्हावें याची चर्चा अनेक प्रबुद्ध आपापल्या परीनें करीत आहेत. अशा वेळीं एकाद्या अप्रबुद्धाला काय वाटतें तेंहि जनतेपुढें येणें अयोग्य होणार नाहीं, असें वाटून तसा थोडासा प्रयत्न या छोट्या पुस्तकांत केला आहे.

अत्यंत थोड्या अवधींत म्हणजे केवळ पांच-सहा दिवसांत पुस्तक तयार करण्याकरितां माझे मित्र श्री. गो. प्र. भावे आणि व्हीनस प्रकाशन या संस्थेचे मालक श्री. स. कृ. पाध्ये यांनीं जे परिश्रम केले त्याची फेड त्या ऋणाचा निर्देश करण्यापलीकडे जास्त करणें अशक्यच आहे.

नागपूर
दि. १-१-५९

अप्रबुद्ध

अनुक्रम २५५५४ वि: निबंध
क्रमांक ७७९५० नों: दि: ३१.३.५८
१०२३०
दा. क्र.

# शिक्षणाचा खेळखंडोबा

## विषयप्रवेश

Under the present dispensation, the educational system is designed to produce the greatest number of intelligent fools. — *Ends & Means*, p. 323.

स्वतंत्र भारताच्या पुढें त्याच्या जन्माबरोबरच ज्या अनेक समस्या पडल्या आहेत आणि ज्या समर्पक रीतीनें सोडविण्याच्या दृष्टीनें त्यांची नालायकी सिद्ध होत असल्यामुळें, ज्या उत्तरोउत्तर अधिक अधिक बिकट होत आहेत, त्यांत सर्वांत कठिण समस्या शिक्षणाविषयींची आहे असें वाटतें. कारण तिचा संबंध स्थूल व सूक्ष्म अशा अनेक शास्त्रांशीं आहे. मात्र संतोषाची गोष्ट ही आहे कीं, या समस्येकडे लहान-थोर सर्वच विचारवंतांचें लक्ष वेधलेलें दिसत आहे. विद्यार्थी, पालक, शिक्षक, विद्वान्, लेखक, लोकसेवक, अधिकारी आणि प्रत्यक्ष भारत सरकार, असे सर्वच प्रकारचे विचारवान स्त्री-पुरुष आपापल्या परीनें या प्रश्नाचा विचार करतांना दिसत आहेत. मराठींतील अशा लेखकांत डॉ. कर्वे यांचा 'किर्लोस्करां'तील ( जुलै १९५८ ) लेख आणि इंग्रजी लेखकांत डॉ. पिरेश यांचा 'The Educator' मधला ( ऑक्टोबर १९५७ ) लेख हे त्यांतल्या त्यांत विशेष मननीय आहेत.

हा प्रश्न अशा रीतीनें बिकट होण्याचीं माझ्या मतें दोन कारणें आहेत. एक तर भारत सरकारला अजून त्याचें गांभीर्य लक्षांतच आलें नाहीं. स्वतःचें आसन दृढ करणें, पक्ष प्रबळ करणें, अनेक प्रकारच्या पंचवार्षिक योजना करून स्वतःच्या कार्यक्षमतेचें अवडंबर करणें आणि पंचशीलाच्या गप्पा मारून जगांत आपला मान वाढविण्याचें स्तोम करणें, यापलीकडे जबाबदार राज्य-शासकांना तमाशा-सारख्या महत्त्वाच्या विषयाकडे लक्ष देण्यास जितका वेळ व कळकळ आहे तितकीहि कळकळ या विषयासंबंधीं दिसून येत नाहीं. पानपत बुडण्याचीं दृश्य कारणें अनेक असलीं तरी माझ्या मतें खरें कारण हें आहे कीं, भाऊसाहेबांनीं अथवा पुणें दरबारनें त्या योजनेचें गांभीर्य लक्षांत घेऊन तिचा समूळ विचारच

केला नाहीं. माझ्या ‘ मराठ्यांच्या उदयास्तांत ’ मीं यासंबंधानें जास्त विचार केला आहे. त्याचें तात्पर्य हेंच आहे कीं, हिंदुस्थानांत थोडी गडबड झाली आहे. मातबर फौज घेऊन गेले म्हणजे नुसत्या रुबाबानेंच कामें करून घेऊं. फारच झालें तर कोठें कांहीं झुंज द्यावी लागेल अशीच त्यांची धारणा प्रत्यक्ष पेंच-प्रसंग पडेपर्यंत होती, तशीच या प्रश्नासंबंधींहि धारणा बहुतेकांची आढळून येते. त्यामुळें त्याचा समूळ असा विचार केलेला कोठें आढळतच नाहीं. असा समूळ विचार करण्याची गरजच न भासणें हेंच माझ्या मतें दुसरें कारण आहे.

या क्षेत्रांत जे गोंधळ माजले आहेत त्यांचें स्वरूप विविध प्रकारचें आहे. परंतु त्यांतील मुख्य गोष्टीसंबंधीं वरील लेखकद्वयांचें जवळजवळ एक मत आहे, हें लक्षांत ठेवण्याजोगें आहे. ( A glaring inequality in educational opportunities that prevails to-day and that needs to be redressed is that between the rural areas and the urban areas. Most of the facilities that exist in the rural areas are at the lowest level. The facilities at the high school stage are extremely meagre and at the higher stage they are virtually non-existent. *Dr. –Pirez, p.* 197)

### मूलग्राही विवेचनाचा अभाव

या विषयावर लिहिणाऱ्या इतर सर्व लेखकांचा आशयहि जवळजवळ असाच आहे. अर्थात् त्यांनीं सर्व विचार शिक्षणकार्यांतील येणाऱ्या लहान-मोठ्या अडचणींच्या दृष्टीनें केले आहेत. परंतु, मला वाटतें, याचा विचार मुळापर्यंत जाऊन जास्त खोलवर केला पाहिजे. कारण, शिक्षण खात्यांतील जो हा अनेक प्रकारचा गोंधळ आहे त्या सर्वांचें मूळ ब्रिटिश सरकारनें अगदीं प्रारंभापासून शिक्षणविषयक जें धोरण स्वीकारलें, त्यामध्यें आहे. हें तर मुदलियार–कमिशनच्या अहवालांत देखील नमूद केलें आहे. ( We may, therefore, conclude that some of the defects persisting today, owe their origin to the policy pursued in the past., *p.* 10 ) परंतु माझ्या मतें हा कांहीं दोषांचा संबंध नसून सबंध शिक्षणविषयक धोरणाचाच आहे, म्हणून त्याचा समूळ विचार केला पाहिजे. आणि तोहि जास्त खोलांत जाऊन केला पाहिजे असें मी म्हणतों. त्याचें कारण हें कीं, सदर कमिशननें म्हटल्याप्रमाणें त्याचा संबंध

सांस्कृतिक मूल्यांशीं येतो. शिक्षणाची त्यांची व्याख्याच अशी आहे कीं, शिक्षण म्हणजे सांस्कृतिक मूल्यांचे जे अनेक लाभ आहेत त्यांच्याकरितां उपयुक्त अशा सुप्त शक्ती उद्दीपित करणारी मानसिक प्रक्रिया. (The education of a mind is essentially a process of re-vivifying in it the latent values contained in the goods of culture., *p*. 221) मुदलियार-कमिशनचा अहवाल काय अथवा या विषयावरील इतर लेखक काय, यांनीं सांस्कृतिक मूल्यांविषयीं जास्त विचार केलेला दिसत नाहीं.

## इंग्रजांच्या पोटांतलें पाप

मुदलिआर-कमिमशननें शिक्षणाच्या इतिहासाचें सिंहावलोकन करतांना ठराविक पद्धतीप्रमाणें बेंटिंग आणि मेकॉलें यांच्यापासून विचार केला आहे. त्याविषयीं आज साधारण सर्व विचारवंतांना माहिती झालेलीच आहे. इंग्रजी शिक्षणाच्या परिणामाविषयीं मेकॉलेनें जें म्हटलें तें आज शंभर टक्के खरें झालें आहे, असें म्हटलें तर फारशी चूक होणार नाहीं. त्याचप्रमाणें शिक्षण खात्याकरितां राखून ठेवलेला सर्व पैसा फक्त इंग्रजी शिक्षणावरच खर्च व्हावा, हें बेन्टिंग सरकारचें धोरणहि स्वराज्यप्राप्तीपर्यंत थोड्या बहुत फरकानें जसेंच्या तसेंच पाळलें गेलें आहे. त्यांत फरक झालाच असला तर तो एवढाच कीं, युरोपियन विद्या आणि विज्ञानशास्त्रें ( European Literature and Science ) असें जें मुळांत म्हटलें होतें त्याचप्रमाणें दोघांवर सारखा भर देण्याऐवजीं देखाव्यापुरतां विज्ञानाचा प्रसार करून विद्येच्या वाङ्मय इ. अंगांवरच सारा पैसा खर्च झाला. आणि त्या काळांत नोकरीची पात्रता हेंच लोकांचें शिक्षणविषयक ध्येय असल्यामुळें आणि राज्यकर्त्यांनाहि कारकुनांचेंच पीक काढावयाचें असल्यामुळें शिक्षण सुधारण्याचीं अनेक सोंगें झालीं तरी स्वरूपतः कांहीं थोडेबहुत फरक होऊन आंतला गाभा जसाच्या तसाच राहिला. परंतु, नुसते कारकून तयार करणें एवढाच कांहीं इंग्रज सरकारचा हेतु नव्हता. त्यांच्या पोटांतील मुख्य पाप वरच्या सांस्कृतिक मूल्यांचा उल्लेख केला आहे, त्याच्या संबंधीं होतें. मी अन्यत्र दाखविल्याप्रमाणें, ॲबे डुबॉयच्या पुस्तकावरून याची स्पष्ट कल्पना येते. हिंदुस्थान शक्य तितक्या जास्तींत जास्त काळ ताब्यांत ठेवणें आणि तेवढ्या काळांत शक्य तितकें सर्व तऱ्हेनें त्याला लुबाडून घेणें हें येथील इंग्रजी राज्यतंत्राचें महावाक्य होतें. तसें करण्याकरितां ॲबे डुबॉयनें सुचविल्याप्रमाणें, युक्तिप्रयुक्तीनें लोकांच्या सर्व निष्ठांचा व

धारणांचा पायाच उखडून टाकणें अवश्य आहे, हें त्याचें म्हणणें मार्मिक होतें. परंतु त्याच्चबरोबर इंग्रज सरकारनें हेंहि ओळखलें होतें कीं, त्या धारणांचें व श्रद्धांचें पोषण करणाऱ्या वर्गांची जनतेच्या मनांतील पत नष्ट करणेंहि तितकेंच अवश्य आहे. हे दोन्हीहि उद्देश साधण्याकरितां काय काय केलें गेलें, हें थोडक्यांत पाहूं.

## उदार शिक्षण (!)

विस्तार न करतांना थोडक्यांत असें सांगतां येईल कीं, आपला वरील उद्देश साधण्याकरितां इंग्रजांनीं जें एक यंत्र निर्माण केलें त्यालाच त्यांनीं 'liberal-education' असें प्रतिष्ठित वा आकर्षक नांव दिलें. बेन्टिंग सरकारनें ठरविल्या-प्रमाणें नुसत्या इंग्रजी विद्येचा प्रसार केला असता तरी त्यांत फारसें नुकसान कोणतेंच नव्हतें. साधल्यास सारा हिंदुस्थान खिश्चन करावयाचा व त्याची छाप पूर्वेकडील इतर देशांवर पाडून कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपाचे खिस्ती त्यांना बनवावयाचे हें त्यांचें पोटांतलें गूढ होतें, अशी साक्ष मॅक्समुल्लर देतो. ( Max Muller's Life and Letters, Vol. 1. p. 191–192 ) अशाच प्रकारें इतरहि अनेक लेखकांनीं लिहून ठेवलें आहे. 'Victorious India' या पुस्तकाचा लेखक तर स्वच्छ असें म्हणतो कीं, हिंदुस्थानामध्यें शूद्र संस्कृतीचा एक वर्ग तयार करणें आणि त्याचा पगडा सर्व जनतेवर बसवून. कोणत्याहि तऱ्हेच्या जुलूम-जबरदस्तीचा देखावा न करतां, कृष्ण कारस्थानांनीं येथील संस्कृतींचा नायनाट करणें, हेंच त्यांचें उद्दिष्ट होतें. ( The British began to accomplish their objective by educating the public, not by conversion. They wanted to create in India a class of Shudras of their culture and to superimpose that class on the rest of the population. This they wanted to accomplish by systimatic suppression of Hindu and Mohammedan culture — not by penalizing the recipiants of Indian educatiation by public torcher, but by more underhand dealings, *p.* 144-145 ) हा आपला हेतु त्यांनीं कसाकसा साधला याविषयींची सर्व प्रकारची माहिती आतां उजेडांत आली आहे. तो किती उत्तम रीतीनें साधला, हें व्हॅलेन्टाईन चिरोलसारख्यांनीं मोठया अभिमानानें

सांगितलें आहे. आणि आज भारतवर्षाचीं राज्यसूत्रें हालविणाऱ्या पं. नेहरूंपासून तों एखाद्या साध्या कारकुनापर्यंत इंग्रजी छापाची जी संस्कृति तांडव करतांना दिसत आहे, तिच्यावरूनहि सहज दिसून येतें.

हा आपला हेतु साधण्याकरितां जें 'liberal education' येथें दिलें त्याचें मुख्य धोरण असें होतें कीं, फ्रेंच पाद्यानें म्हटल्याप्रमाणें स्वतःच्या संस्कृतीविषयीं लोकांचीं अंतःकरणें निष्ठाहीन व्हावींत आणि तेवढ्याकरितां शिकणाऱ्याच्या अंतःकरणावर जें जें म्हणून त्याचें स्वतःचें असेल त्याच्याविषयीं एक प्रकारचा तिरस्काराचा संस्कार व्हावा. धर्मपरिवर्तनानें ही गोष्ट झाली नसती. धर्मपरिवर्तनामध्यें एक रोप उपटून त्याच्या जागीं दुसरें लावावें त्याप्रमाणें एकनिष्ठ नाहींशी करून, कोणतीहि का होईना, दुसरी प्रस्थापावयाची असते; आणि ही गोष्ट एरव्हीं कितीहि हानिकारक असली तरी त्यांत मनुष्य आपल्या माणुसकीला अजिबात आंचवत नाहीं. मनुष्याच्या प्रामाणिक निष्ठा कोणत्याहि स्वरूपाच्या असोत, आज ज्याचा फार उच्चार केला जातो ते 'मानव्य' राखूनच त्या निष्ठांचा विस्तार होतो. कारण, निष्ठेचें रोप मानव्याच्या खतांतूनच उत्पन्न होतें. परंतु इंग्रज लोकांना इथली प्रजा मानव्याच्या दृष्टीनेंहि हीन बनावयास पाहिजे होती. म्हणून, बर्कनें ज्याप्रमाणें फ्रेंच लोकांविषयीं म्हटलें आहे त्याप्रमाणें येथील शिकलेल्या लोकांच्या मनांत आपल्या पूर्वदिव्याविषयीं अनादर उत्पन्न होईल असेंच त्यांचें एकंदर धोरण होतें. ( You have begun ill, because you have been taught to despise. You aught to have been taught to revere. )

अशा प्रकारच्या उदार म्हणजे स्वैर शिक्षणाचा परिणाम खऱ्या उदार शिक्षणाच्या अगदीं उलट होईल यांत कांहीं शंका नाहीं. अमेरिकन लोकांविषयीं आणि त्यांच्या उदार शैक्षणिक धोरणाविषयीं डॉ. लिंकनें जें लिहिलें आहे त्याचें मूर्तिमंत स्वरूप येथें दृष्टीस पडतें. The centrel of liberal education has been to encourage every student to develop his own code in respect to marriage, government, business, labour, international relationships, religion, etc. Therefore instead of an increasing agreement, at least in respect to fundamental rules, we have educated people to greater and greater

disagreement in respect to both fundamentals and details. —' *Rediscovery of Man,*' p. 174.

### मॅक्समुल्लरचें अंतरंग

शिक्षण म्हटलें कीं, तात्त्विक आणि प्रायोगिक अशा दोन बाजू आल्याच. तात्त्विक बाजूविषयीं थोडक्यांत दिग्दर्शन वर केलें आहे. आतां या उदार शिक्षणाच्या (!) प्रायोगिक बाजूकडे वळूं. कागदोपत्रीं प्रकट गर्जना कांहींहि असोत. क्रियायोगाच्या दृष्टीनें त्याचें एक धोरण पहिल्यापासून दिसून येतें. इंग्रजासारख्या धूर्त लोकांच्या हें सहज लक्षांत आलें होतें कीं, कांहीं काळ जरी लोक आपल्या मायेनें मोहित झाले तरी ती स्थिति फार काळ राहणार नाहीं. आणि त्या स्थितींतून जागे होऊन आपले डावपेंच ओळखणारा व त्या दृष्टीनें आपल्याला विरोध करणारा देशांत कोणी असला तर तो ब्राह्मणच आहे. आणि देशांतील लोकांचा ब्राह्मणांवर विश्वासहि आहे. केव्हांहि कोठेंहि आढळणारीं कांहीं वैयक्तिक स्वरूपाचीं उदाहरणें आणि प्रचारकी ढंगाचे प्रयत्न सोडले तर इतिहासाची साक्ष अशी आहे कीं, या विश्वासानें त्यांच्याकडे येणारी जबाबदारी ब्राह्मणांनीं केव्हांहि झुगारून दिलेली नाहीं. तेव्हां आपलें उदार (!) शिक्षण पूर्ण यशस्वी व्हावयाचें असलें तर शिक्षणाच्या दृष्टीनें ब्राह्मण आणि तदितर जनता यांच्यांतील बौद्धिक अंतर नाहींसें केलें पाहिजे. हें बौद्धिक अंतर कां रहात आलें आहे, तें इष्ट होतें का अनिष्ट होतें इ. प्रश्नांची निर्भीड चर्चा 'ब्राह्मणः एक राष्ट्रीय प्रश्न' या माझ्या पुस्तकांत मीं केली आहे. तिचा विस्तार न करतांना येथें एकढेंच म्हणतों कीं, मॅक्समुल्लर ज्या वेळेला ब्राह्मणांच्या नांवानें खडे फोडतो तेव्हां त्यांत नुसतीच धार्मिक तळमळ नसते, इतका सारा भावगर्भ असतो. ( I should like to live for ten years quite quietly and learn the language, try to make friends and then see whether I was fit to take part in a work by means of which the old mischief of the Indian priestcraft could be overthrown. ) याच पत्रांत तो पुढेंहि सांकेतिकपणानें असें म्हणतो कीं, या विषयीं पुष्कळच बोलण्याजोगतें आहे आणि एवढें मोठें जग आपल्यापुढें पडलें आहे कीं, त्याचें आक्रमण करण्यांत आयुष्य खर्च करणें हें देखील पुऱ्या मोलाचें ठरेल. ( Much more chould be said about this.

A wide world opens before one for which it is well worthwhile to give one's life. )

## मानवेंद्र रॉयचा खेद

हें आपलें उद्दिष्ट साधण्याकरितां जर इंग्रजांनीं प्रामाणिक प्रयत्न केला असता तर खरोखरच कांहींहि नुकसान नव्हतें. देशांतील प्रत्येक व्यक्तीची बौद्धिक पात्रता या दृष्टीनें का होईना, सर्वच जण ब्राह्मण झाले असते तर त्या भाग्याला सीमा नव्हती. परंतु तें इंग्रज लोकांना इष्ट नव्हतें. मानवेन्द्र रॉयसारख्यांना देखील महाराचा ब्राह्मण होण्याऐवजीं ब्राह्मणाचा महार होत आहे अशा आशयाचे खेदोद्गार काढण्याची पाळी यावी हें त्यांचें उद्दिष्ट होतें. जवळ जवळ पन्नास वर्षें इंग्रज लोकांनीं असें धोरण ठेविलें होतें कीं, शिक्षणाचा दर्जा निदान साहित्य इत्यादिक बौद्धिक बाबतींत तरी फारसा खालावूं न देतां ब्राह्मणांशिवाय इतर वर्ग, व विशेषतः ज्यांना मागासलेले असें म्हणण्यांत येतें ते आणि ब्राह्मणांनीं ज्यांना शिक्षणापासून वंचित केलें असें समजलें जातें त्या स्त्रिया, यांना सर्व तऱ्हेनें प्रोत्साहन देऊन ब्राह्मणांतील व त्यांच्यांतील अंतर नाहींसें करावयाचें. तसें पाहिलें तर हें धोरणहि अनिष्ट व राष्ट्रविघातक नव्हतें. परंतु हें उद्दिष्ट साधण्याकरितां त्यांनीं आपल्या शिक्षणाची घडण जी ठरविली ती सर्वथैव सदोष होती आणि ती शेवटपर्यंत हितकारक अशी सुधारली गेलीच नाहीं. साक्षरता म्हणजे शिक्षण नव्हे; मुख्य दोष असा होता कीं, शिक्षण म्हणजे साक्षरता असेंच समीकरण मांडण्यांत येऊन खऱ्या शिक्षणाच्या दृष्टीनें कधींहि विचार झालाच नाहीं. आणि हें समीकरण एकदां जें बोकांडीं बसलें आहे त्यांतून आमची मुक्तता अजूनहि होत नाहीं. गेल्या शंभर वर्षांत स्त्रियांच्या कैवारानें जें कांहीं समंजस-असमंजस असें अनेक प्रकारचें वाङ्मय उत्पन्न झालें त्याचें मूल्यमापन कोणी कसेंहि करोत, त्यांतहि साक्षरता म्हणजेच शिक्षण हीच समजूत विशेषें-करून दिसून येते. विद्यालयाच्या पदवीमुळें अथवा कमी-अधिक लेखनकौशल्य अंगीं असल्यामुळें विद्वान् समजल्या गेलेल्या स्त्रिया आपल्या वर्गाच्या उद्धारार्थ आज जें कांहीं लिहितात व बोलतात त्यांत, मीं माझ्या 'ब्राह्मण' या पुस्तकांत म्हटल्याप्रमाणें, व्हिक्टोरिया युगांतील जुरसटलेल्या विचारसरणीचेंच थैमान थोड्याबहुत फरकानें दिसून येतें. साक्षरतेचा प्रसार होऊं नये असें अर्थातच कोणीहि म्हणत नाहीं; परंतु साक्षरतेशिवायहि सुशिक्षण असूं शकतें ही गोष्ट विसरतां

कामा नये. सुदैवानें या गोष्टीची जाणीव बडोद्याच्या 'राजरत्नां' सारख्यांनाहि आतां होऊं लागली आहे, 'साक्षरतेमुळें अज्ञानाचा फैलाव' होतो आणि लिहितां-वाचतां येणें म्हणजे, अज्ञान नाहींसें होणें हें अर्थशून्य समीकरण आपण उगाच मांडतों, असें आतां तेहि प्रतिपादूं लागले आहेत. ( रम्यकथा, सप्टेंबर १९५२ )

## मनुष्यरूपेण मृगाश्चरन्ति ।

याच्याच जोडीला इतरहि कांहीं महत्त्वाचे दोष त्यांत शिरले असून शिक्षण-शास्त्राचीं कित्येक मूलतत्त्वेंहि नजरेआड केलीं आहेत. व्यक्ति या दृष्टीनें मनुष्याची तयारी करण्याच्या बाबत अमेरिकेंतील लोकांसंबंधीं डॉ. लिंकनें म्हटल्याप्रमाणें, स्वतःचें जें प्रेयस् तेंच श्रेयस् असें होतें. ( The underlying cause of this trend lies in the popular philosophy of expression, the doctrine that individual must live his own life, that inhibitions and suppressions are harmful, that he must interpret the rules of life according to his own understanding or conscience.–' *Rediscovery of Man* ', *p*. 174 ) विशेषतः गेल्या पन्नास वर्षांत विदग्ध म्हणविलें जाणारें जें गद्य अथवा काव्य-वाङ्मय, खांडेकर–फडक्यांपासून तों एखाद्या संसाराचा व जगाचा मुळींहि अनुभव नसलेल्या ठराविक परिभाषा पाठ केलेल्या पोरीपर्यंत, अनेक लेखकांनीं उत्पन्न केलें आहे, त्यांतीलहि मुख्य सूर हाच आहे. या धोरणाचा एक अवश्य परिणाम हा झाला आहे कीं, मनुष्याच्या विचाराला आणि आचाराला तात्त्विक अधिष्ठान असें कोणतेंच राहिलें नाहीं. परंतु, सदसद्विवेक बुद्धीचें आणि शुद्ध हेतूचें केवढेंहि स्तोम माजविलें तरी मनुष्याच्या विचाराला तात्त्विक अधिष्ठान असल्याखेरीज त्याला खरें मनुष्यत्व येत नाहीं, ही गोष्ट आतां बहुतेक सर्वमान्य झाली आहे. तेव्हां त्यासंबंधीं जास्त विवेचन न करतां एवढेंच म्हणतों कीं, या धोरणाचा युरोपांत जो परिणाम घडून आला तोच येथें जास्त विकृत स्वरूपांत दिसून येत आहे. ह्यू शिअरमन नांवाच्या एका लेखकानें म्हटलें आहे कीं, धर्मावरचा विश्वास उडवून टाकण्याच्या प्रयत्नानें युरोपियन प्रज्ञावंतांपुढें गेल्या पिढींत मोठा प्रश्न उत्पन्न झाला. नीतीची आणि नैतिक शिक्षणाची तर समाजाच्या सुस्थिरतेला आणि सुस्थितीला गरज आहे ही गोष्ट

निर्विवाद आहे. तेव्हां नैतिक शिक्षण देण्याचा प्रयत्न करणें तर भाग होतें. परंतु नीतीला जर तात्त्विक अधिष्ठान नसलें आणि कोणत्या तरी निष्ठेंतून ती निघाली नसली तर तिच्या कितीहि गप्पा मारल्या आणि शिक्षणाचीं केवढींहि अवडंबरें केलीं तरी तीं अंतःकरणांत मूळ धरूं शकत नाहीं, त्या साऱ्या वर्षावांतहि कमल-पत्राप्रमाणें अंतःकरण अलिप्त राहतें आणि अखेरीस समाजाचें गाडें रेटण्या-करितां भय आणि लोभ यांचाच, या नाहीं त्या रीतीनें, आश्रय करावा लागतो. लवकरच सारा समाज मानवी पशूंच्या एका विशाल अटवीसारखा होतो. इतकेंच नाहीं तर वन्य पशूंच्या अटवीपेक्षां तो जास्त भयंकर असतो. (It was the dilema of the rationalists of an older generation that, having attacked and demolished to their satisfaction the basis of Christian religious belief, they were reduced to preaching the ethics of religion without it's mystical sanctions. But if we remove all mystical intimations of unity and life, nothing but a balancing of the forces of fear and greed stands between us and cannibalism. We go then into a human jungle more dangerous than the vegetable and animal jungle as human intellect is more ingeneous than vegetable and annimal intellect.)

ह्या धोरणाचा परिपाक किती कल्पनेबाहेर यशस्वी झाला तें, आज जी पं. नेहरू-सारख्या मोठमोठ्या पुढाऱ्यांपासून तों एखाद्या अगदीं सामान्य कामकऱ्यापर्यंत, सर्वजण नैतिक ऱ्हासाची ओरड करतांना आढळतात, त्यावरून लक्षांत येईल. देशाचें धुरीणत्व जिनें आपल्याकडे घेतलें होतें त्या कॉंग्रेसचें तर याबाबतींत किती अधःपतन झालें होतें याविषयीं आयुष्याच्या अखेरी अखेरीस गांधीजींनीं प्रांजळपणें काढलेले खेदोद्गार सुप्रसिद्धच आहेत.

## समानतेची मूर्ख कल्पना व अधिकारभेद

या उदार (!) शिक्षणाचा आणखी एक दोष असा होता कीं, समानतेच्या मूर्ख कल्पना प्रमाण मानल्यामुळें शिक्षणाच्या बाबतींत अधिकारभेदाला महत्त्व दिलें पाहिजे, हें विसरलें गेलें. आणि हिंदुस्थानसारख्या देशांत तर हें विशेषतः लक्षांत ठेवावयास पाहिजे होतें. कारण, येथली सारी समाजरचनाच, नुसती

शतकानुशतकेंच नव्हे तर कित्येक सहस्रकें अधिकारभेदावरच उभारली गेली आहे. ही गोष्ट बुद्धिमान् इंग्रजांना माहीत नव्हती, असें नाहीं. परंतु शिक्षणाच्या-जोरावर ही अधिकारभिन्नता आपण मोडून टाकूं असा त्यांचा आग्रह होता. हें करणेंहि थोडेसें, घोड्यापुढें गाडी जुंपण्यासारखेंच होतें. कारण शिक्षण झालें तरी त्याचा संस्कार घेणारें अंतःकरण तें आपल्या मगदुराप्रमाणेंच घेतें आणि नुसतें समानशिक्षण देण्यानें अधिकारभेद नाहींसा तर होत नाहींच परंतु उलट ते भेदच जास्त दृढ केले जातात असें एका शिक्षण-तज्ज्ञानें म्हटलें आहे तें अनुभवसिद्ध आहे. नुसत्या शिक्षणानें हे भेद नाहींसे होत नाहींत. अथवा केवळ बाह्य परिस्थितीनेंहि ते नाहींसे होत नाहींत. उलट, शिक्षणाच्या अपक्वतेमुळें व्यक्ति आपलें स्वतःचेंच एक विश्व उत्पन्न करूं पहाते. ( We must recognize a normal distribution of intelligence, and no equallizing of environmemt would make everyone equal. –*p.* 143.

The gain from teaching is proportionate to the ability to learn. Equal practice does not smooth out differences in ability or tend to make pupils more equal. Rather does it emphasize the differences between them. –*p.*143.

The environment of the institution may be closely similar but it does not produce greater uniformity of intelligence. – *p.* 145.

Individuals tend to in creae their own environment.

— *p.* 145.

*Environment and Heredity,*

*by Olive Dickinson Maguynne Edn.* 1940 )

ही शिक्षणांतील ऐक्याची कल्पना राष्ट्रानें उराशीं बाळगलेल्या, ऐक्य म्हणजे सरूपता या मूर्ख कल्पनेंतूनच निघालेली आहे. क्लाईव्ह बेलनें संस्कृति म्हणजे Civilization या आपल्या पुस्तकांत असें म्हटलें आहे कीं, उच्च संस्कृतीचा अवश्य परिणाम म्हणजे सरूपता उत्पन्न होणें ही एक खुळचट कल्पना आहे. जोंपर्यंत मनुष्यामनुष्यांत असे अधिकारभेद आहेत तोंपर्यंत अशी बळेंच

आणलेली सरूपता हितपरिणामीं होणें शक्य नाहीं. किंवा कांहीं काळ तरी तसा देखावा दिसला तरी अखेरीस तिचे परिणाम चांगले होणार नाहींत.

## लिन् यु टँगची साक्ष

. याचें कारण असें आहे कीं, चिनी लेखक लिन युटंग यानें म्हटल्याप्रमाणें, व्यक्तिशः मनुष्यजातीनें उन्नतीचें फार उंच शिखर गांठलेलें दिसत असलें तरी मानवी समाज अजून बहुधा अनेक प्रकारच्या पशुत्वाचा प्रतिपाळ करणाराच आढळून येतो. आणि शास्त्राची केवढीहि वाढ झाली असली तरी मानवी अंतःकरणांतल्या स्वयंभू पाशवी अंशाच्या वर जाऊन मनुष्यजीवनाविषयीं विचार करण्याची पात्रता असण्याइतकीं अंतःकरणाचीं उच्च धारणा किती प्रमाणांत आढळून येईल कोण जाणे ! (I am less hopeful about the general development of the critical mind in dealing with humam affairs, or about mankind reaching a calm and understa-ding far above the sea of passions. Mankind as individuals may have reached austere heights, but mankind as social groups are still subject to primitive passions, occasional back slidings and outcropings of the savage instincts and occasional waves of fanaticism and mass hysteria.

*The Importance of Living, p. 55*)

## सरूपतेचा अट्टहास हा संस्कृतीचा दोष

निर्मळ मनानें विचार करणाऱ्या कोणालाहि असें आढळून येईल कीं लिन यु टँगच्या म्हणण्यांत फार यथार्थता आहे. आणि अशी स्थिति आहे तोपर्यंत केवळ प्रचाराच्या जोरावर खरी सरूपता वा खरें साम्य उत्पन्न होईल ही गोष्ट अशक्य आहे. बेसिक शिक्षणाचे उद्देश सांगतांना म्हटलें जातें कीं, व्यक्तीची सर्व-संवादी अशी धारणा होईल अशा रीतीनें तिची वाढ व्हावी. (develop. ment of a hormonious individual) परंतु या सर्व-संवादाचें स्वरूप पाहिलें म्हणजे तेव्हांच लक्षांत येतें कीं, त्याचें स्वरूप सरूपतेहून भिन्न नाहीं- क्लाईव्ह बेलनें म्हटल्याप्रमाणें असें दिसतें कीं, आजची पाश्चात्य बुद्धि अशी खुळी कल्पना घेऊन बसली आहे कीं, सुसंस्कृति म्हटली म्हणजे तिचा परिणाम

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें, स्थळप्रत.

सरूपतेंत झालाच पाहिजे. (The popular theory that high civilizations necessarily impose uniformity is what popular theories generally are. ) असें दिसतें कीं, संस्कृतीच्या या कल्पने-प्रमाणें बहुशः सरूपतेचें हें खूळ उत्पन्न होतेंच. तें अर्थातच संस्कृतीला फार घातक आहे. ( Thus there may arise tendency to uniformity. This is a danger of civilization. )

## इंग्रेजी कावा

वर निर्दिष्ट केलेल्या मूलभूत दोषांशिवाय इतर परिस्थितीहि इंग्रजांच्याउदार (!) धोरणाला साह्य करणारीच होती. तरी देखील त्याच धोरणाला जर इंग्रज सरकार चिकटून राहिलें असतें तरी फारसें नुकसान न होतें. परंतु सुमारें पन्नास वर्षें प्रयत्न केल्यानंतर इंग्रजांना असें निश्चित आढळून आलें कीं, व्यक्तिशः अब्राह्मणांतून केवढेहि विद्वान् निघाले तरी समाज या दृष्टीनें त्यांची बौद्धिक पातळी ब्राह्मणांच्या जोडीला येऊन बसणें, हें फार दुर्घट व कालावधीचें काम आहे. तेव्हां त्यांनीं आपल्या प्रयोगांत थोडा फेरफार मुकाट्यानें केला. कोणतीहि इमारत उठविणें हें काम जिकिरीचें आहे. परंतु ती जमीनदोस्त करून टाकणें हें फारच सुलभ आहे, हा निर्विवाद अनुभव आहे. त्याचाच फायदा त्यांनीं घेतला. मागासले म्हणविल्या गेलेल्या वर्गांना वर उचलतां येत नसलें तरी वरच्या वर्गांना खालीं आणणें खास सुलभ होईल, हें जाणून हळूहळू त्यांनीं आपल्या शिक्षणांत तशा तऱ्हेचे बदल करण्यास सुरवात केली. माझ्या आठवणी-प्रमाणें १९०६ सालीं वऱ्हाडांत त्या वेळीं असलेले शिक्षणाधिकारी कॅन्डी हे निवृत्त होऊन त्यांच्या जागीं इव्हान्स आले व तेथपासून हें धोरण सुरू झालें असें त्या वेळींच झालेल्या कांहीं चर्चेवरून मला आठवतें. कमी-जास्त प्रमाणानें हेंच धोरण सर्व हिंदुस्थानांत अवलंबिलें गेलें. तोंडानें कितीहि मोठमोठ्या गप्पा मारल्या तरी direct पद्धतीपासून तों आजच्या basic शिक्षणापर्यंत शिक्षणाचीं सारीं सोंगें या धोरणाचाच पुरस्कार करणारीं आहेत. आणि शिक्षणसंस्थांचा आणि प्रत्यक्ष समाजाचा बारीक अभ्यास करणाऱ्या कोणालाहि हें धोरण किती यशस्वी झालें आहे याची साक्ष येईल. नैतिक वगैरे इतर गोष्टी तर असोतच पण बौद्धिक दृष्ट्याहि ब्राह्मणांच्या मुलांचा उत्तरोत्तर ऱ्हास होत आहे, ही गोष्ट

कोणासहि कबूल करावी लागेल. राष्ट्रदृष्ट्या या गोष्टीचें इष्टानिष्टत्व पुढें पाहूं. परंतु तूर्त एवढेंच म्हणतों कीं, अशी वस्तुस्थिति आहे.

### राष्ट्रीय चळवळ व शिक्षणावरील दुष्परिणाम

योगायोग असा झाला कीं, इंग्रजांच्या या धोरणालाहि विकृत करणारी आणखी एक गोष्ट त्या वेळीं घडून आली. आणि ती म्हणजे रिस्ले सर्क्यूलरचा जन्म. सन १९०५ सालीं कर्झन साहेबानें हट्टानें बंगालची फाळणी केली आणि भारताच्या इतिहासांतील नव्या युगाला प्रारंभ करून दिला. सर्वस्वावर उदार होऊन राष्ट्रीय चळवळींत जर कोणी प्रथमतः पडले असतील तर ते भारतीय तरुण. त्या सर्व चळवळीचा इतिहास प्रसिद्ध असल्यामुळें येथें पुनरावृत्तीची गरज नाहीं. त्या संकटाला तोंड देण्याकरितां इंग्रजांनाहि आपलें मायावी धोरण टाकून शिक्षणाला उघड उघड स्वतःच्या राजकीय चौकटींत बसवावें लागलें. आणि तेव्हांपासून शिक्षण खात्याचें लक्ष शिक्षणापेक्षां या दुसऱ्या गोष्टीवरच जास्त केन्द्रित झालें. मागासलेल्या जातींचा कळवळा वर उसळून आला. सत्यशोधक चळवळीसारख्या पडद्याआड असलेल्या चळवळी रंगणांत येऊन त्यांना बाळसें चढलें. शिक्षकवर्ग हा बहुधा बुद्धिमान् वर्ग असल्यामुळें त्याच्या क्रियाशक्तींना इतरत्र वाव मिळूं नये म्हणून नाना तऱ्हेच्या शैक्षणिक तंत्रांत त्याला गुंतवून ठेविलें गेलें आणि विद्यार्थ्यांच्या बाबतींतहि अनेक भानगडी होऊन लोकमान्यांनीं साऱ्या जन्मांत उपयोग केला नसेल इतक्या वह्यांच्या भाराखालीं एका वर्षांत मरून जाण्याचा त्याच्यावर प्रसंग आला! या चळवळीचा अनेक रीतींनीं परिणाम होऊन देशाची आर्थिक स्थितीहि चमत्कारिक झाली. कुटुंबसंस्थेवर तिचा परिणाम होऊन ती उच्छिन्न होण्याच्या मार्गाकडे वळली. शिक्षणाचें आद्य तत्त्वच मुळीं नाहींसें होऊन त्याच्या वाढीला जें अवश्य तें घरीं-दारीं त्याला कोठेंच मिळेनासें झालें. शिक्षणाचे विषय व प्रकार कोणतेहि असले आणि त्याचीं सोंगें कशींहि असलीं तरी खरें शिक्षण शिक्षक व विद्यार्थी यांच्यांतील जिव्हाळा आणि शिक्षकाचें विद्यार्थ्यांवरील वजन यांवर अवलंबून असतें असें जेम्स रॉसनें म्हटलें आहे तें कितीतरी यथार्थ आहे! ( Education as the last resort is not possible without influence.) त्यांतच अनेक प्रकारच्या मोहक नांवाखालीं उत्पन्न होणाऱ्या पोटभरू वाङ्मयाची भर पडली. जीवनविषयक मूळचे सारे दृष्टिकोन नष्ट होऊन वर डॉ. लिंकचें म्हणणें दिलें

आहे त्याप्रमाणें सारा मामला conscience वर येऊन बसला! हल्लींच्या काळाची मोठी शैक्षणिक गैरसोय ही आहे कीं, शाळेंत शिकविलें जातें त्याला साह्य करण्याजोगी परिस्थिति घरींदारीं कोठेंच मिळत नाहीं, म्हणून मुदलियार-कमिशननें खेदोद्गार काढला आहे तो या वरील सर्व गोष्टींचाच परिणाम आहे.

## गांधी मन्वंतराचा उदय व काँग्रेसनें पालटलेलें रूप

या सर्व गोष्टी हळूहळू घडल्या तरी त्यांचे परिणाम लक्षांत येऊन कांहीं तोड निघाली असती. परंतु पहिल्या महायुद्धानंतर दोन महत्त्वाच्या गोष्टी घडून त्यांचाहि विलक्षण परिणाम झाला. नाटक म्हणून का होईना सुधारणांच्या रूपानें हळूहळू स्वराज्याचे हक्क हिंदुस्थानला देण्याचा उपक्रम इंग्रजांनीं केला. आणि कदाचित् लोकमान्य विद्यमान असते तर त्यांच्या नेहमींच्या धोरणाप्रमाणें हळूहळू त्या पचनीं पाडूनच लोकमान्यांनीं स्वराज्याचा लढा लढविला असता. परंतु त्या ऐन प्रसंगींच त्यांचें आयुष्य संपलें. भारतीय अंतःकरण आणि पाश्चात्त्य डोकें असलेल्या गांधीजींचा उदय झाला व त्यांना एका वर्षांत स्वराज्य मिळविण्याची घाई झाल्या कारणानें नुसत्या राजकीय चळवळींचेंच नव्हे तर सर्व राष्ट्रजीवनाचेंच गाडें पालटून गेलें. हिमालयाएवढ्या चुका झाल्या, स्वराज्यप्राप्तीचे सट्टे झाले, सत्याचे व आत्मशिक्षणाचे अनेक प्रयोग झाले, आणि काँग्रेसचें मूळचें सारें धोरण पालटून देशाची सारी उन्नति केवळ अस्पृश्योद्धारावर अवलंबून राहिली. विशिष्ट वर्गाच्या अथवा समाजाच्या बाबतींत हात न घालतां विशाल भारताचे जे सामान्य प्रश्न राहतील तेच हातीं घेऊन कार्य करण्याचें काँग्रेसचें धोरण तोपर्यंत किती अव्याहत होतें हें पुढील दोन उताऱ्यांवरून कळून येईल :-- " I therefore think gentlemen that the only wise and indeed the only possible course we can adopt is to confine our disenssions to such questions as affect the whole of India at large, and to abstain from the discussions of questions that affect the particular part of a particular community only." (*Budruddin Tayyabji, President,* 3rd Congress. ), " The congress has neither done mischief or misled the people nor again has it set the examples of a class agitation as it agitates for all and on constitu-

tional lines. It has always refused to identify itself with any section of Indian nation as it is undenominational and will I hope always keep to its policy and abide by these principles." ( *Hari Krishna, President, 4'h Congress* )

प्रस्तुत विषयांत वास्तविक हें समालोचन करण्याचें कारण नाहीं असें वाटेल. परंतु त्यांचा कार्यकारणरूप प्रत्यक्ष संबंध विद्यार्थिजीवनाशीं असल्यामुळें थोडें गतावलोकन करणें भाग पडलें. रिस्ले साहेबाच्या पोटांतून हेतु कांहींहि असो, रिस्ले सर्क्युलर जर प्रभावी झालें असतें तरी कदाचित् विद्यार्थिजीवनाच्या दृष्टीनें अनिष्ट परिणाम झाला नसता. परंतु मानसशास्त्राच्या सिद्धान्ताला रिस्ले तरी अपवाद कसा ठरावा ? मुद्दाम प्रचार करून शाळेंत जें शिकविलें जातें त्याचा परिणाम नेमका त्याच्या उलट विद्यार्थिमनावर होतो असा एक विशिष्ट विद्यार्थी-मनोधर्म आहे म्हणून प्रो. हार्नशॉनें म्हटलें आहे तें अतिशय सत्य आहे असें मला स्वतः माझ्या विद्यार्थिदशेंतील अनुभवांवरून पटलेलें आहे. ( Perhaps in course of time politicians will come to learn that nothing is so likely to defeat its own aims as propaganda in schools. The thing that students love least are those things that have been drilled into them by pedagogues; and the dogmas, as they grow older, they are most disposed to doubt are precisely those which have been impressed upon them in their infancy by irresistible authority. This is a lesson which might with advantage be borne in mind with a number of people in all countries who are eager to secure the aid of educational authority in their endeavour to use the history teachers in the public schools as missionaries for ... causes which they consider to be good.

— *Outline of Modern Knowledge,* )

उतारा जरा मोठा झाला; परंतु महत्त्वाचा आहे म्हणून तेवढा देणें भाग पडलें.

## विद्यार्थी बिघडला

तात्पर्य इतकेंच कीं, राजकारणापासून अलिप्त रहाण्याऐवजीं राजकारणांत विद्यार्थी पुरे फेकले गेले. आणि त्याचा अपरिहार्य तोच परिणाम घडून आला. वरील हार्नशॉच्या उताऱ्यामध्यें सांगितलेलें तत्त्व थोडें मर्यादित रीतीनें सांगितलें गेलें आहे. अशा रीतीनें दिल्या गेलेल्या शिक्षणाचे dose विद्यार्थ्यांना पचवितां तर येत नाहींतच पण बहुतकरून त्याचा परिणाम अगदीं उलटा झालेला दिसून येतो. प्रारंभीं दिलेल्या बर्कच्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे प्रचारांतील द्वेषअंशाचा तो पुरतेपणीं स्वीकार करून कमालीचा द्वेष्टा बनतो आणि अनुकरणीय उदात्ततेला माशीसारखा उडवून देऊन पुरता बेछूट आणि गुंड बनतो. थोडक्यांत वरील काळासंबंधानें म्हणावयाचें म्हणजे जवळजवळ असाच परिणाम विद्यार्थिजीवनावर होऊन विद्यार्थिजीवनाच्या तीन-चार पिढ्या अगदीं बरबाद झाल्या. आजच्या विद्यार्थ्यांविषयीं जे सर्वत्र खेदोद्गार निघतात त्याचें कारण हें असें आहे. मुदलियार-कमिशननें जरी वैयक्तिक जीवनांत न शिरतां सांघिक बाजू तेवढी लक्षांत घेऊन जपून लिहिलें असलें तरी हा परिणाम मान्य केला आहेच आणि त्याचें समर्थन करण्याचा प्रयत्न केला तरी ती प्रथा आज इष्ट नाहीं असें म्हटलें आहेच. ( While as individuals many of our students are as good as elsewhere, the tendency to group indiscipline has increased in recent years ... For various reasons, under a foreign regime, acts of indiscipline became frequent, often necessitated by the political activities which were launched against a foreign government. While there may have been justifications for such indiscipline under diffrent practical circumstances we feel that there is no justification for such act of indiscipline after the attainment of independence — *p.* 122 ) सुतावळ उठविणें सोपें असतें, परंतु ती ताब्यांत ठेवणें तितकेंच दुर्घट आहे. अनिष्ट गोष्ट म्हटली तरी त्याला उपाय काय करावा हें मुदलियार-कमिशनला सांगणें शक्य नाहीं. नुसते आशावाद आणि शिफारशी यानें हें काम होत नसतें. त्याला मुळाला हात घालावा लागतो.

## शिक्षणाचें पारतंत्र्य

वर थोडें निर्दिष्ट केलेंच आहे कीं, या सर्व गोंधळाचें कारण शिक्षणाचीच तर काय पण भारतीय जीवनाचीच तात्त्विक बैठक नाहींशी झाली आहे. वस्तुतः त्या तात्त्विक बैठकीच्या अनुरोधानेंच राष्ट्राचें राजकारण चाललें पाहिजे म्हणजे त्यांतील शिक्षण हवें तसें वळणदार होतें. जेम्स रॉसनें आपल्या पुस्तकांत म्हटल्याप्रमाणें अधिष्ठानभूत राष्ट्राचें जें तत्त्वज्ञान त्याचें स्वरूप म्हणजेच राष्ट्राचें राजकारण. ( Nation's politics are its philosophy in concrete form.) परंतु आज सर्वत्र परिस्थिति मात्र उलट झाली आहे. रॉस म्हणतो त्याप्रमाणें आपल्या राजकारणाच्या धोरणानें आजकाल राष्ट्रांत तत्त्वज्ञान उत्पन्न केलें जातें आणि वर सांगितल्याप्रमाणें त्याचे घुटके शिक्षणाच्या रूपानें विद्यार्थ्यांच्या घशांत ओतले जातात. गांधीजींचें तत्त्वज्ञान आणि पुण्यास भरलेल्या शासनशास्त्र परिषदेच्या अध्यक्षानें म्हटल्याप्रमाणें प्रेषितपणाच्या (prophet) अभिनिवेशानें घोषणा करणाऱ्या विनोबा भाव्यांच्या बायकांच्या बंडापर्यंत विचारसरणी नीट लक्षांत घेतल्या म्हणजे रॉसच्या या म्हणण्याची साक्ष पटते. शैक्षणिक दृष्टीनें देशाची पुनः घडी बसवितांना या गोष्टीचेंहि महत्त्व लक्षांत घेतलें पाहिजे.

## खरें लोकराज्य

विशाल भारताच्या लोकसमाजाविषयीं विचार करतांना एक गोष्ट लक्षांत घेतली जात नाहीं. लोकराज्याचें पहिलें तत्त्व जर कोणतें असलें तर हें आहे कीं, ज्याला त्याला आपल्या विवेकबुद्धीस पटणाऱ्या निष्ठेला अनुसरून जगतां आलें पाहिजे. त्या बाबतींत जर त्याचा कोंडमारा होऊं लागला अथवा करण्यांत आला तर तें लोकराज्याचें एक सोंगच होय. लोकशाहीची अपेक्षा असते त्याप्रमाणें खरें स्वतंत्र व्यक्तिमत्त्व वाढविण्यास अवकाश न मिळाल्यामुळें लोकराज्याचा मोठा भाग अपंग आणि विशविशीत रहातो हें उघड आहे. तिची अपेक्षा मात्र उलटी असते. लोकशाहीचें सारें बळ समंजसपणें वाढ झालेल्या अशा व्यक्तींतच आहे असे डॉ. लिंक म्हणतो तें खरें आहे. ( The strength of democracy lies in the freedom and determination of its millions of independent personalities not in the all-wise planning of a few. -- *Rediscovery of Man*, p. 147. ) आज तर या few चाहि संकोच एकट्या पंडित म्हणविणाऱ्या नेहरूंत झाला आहे !

शिक्षणाच्या दृष्टीनें विचार करावयाचा म्हणजे भारतीय समाजाचा विचार करणें जरूर आहे. इंग्रजी राज्य असतांना निरनिराळीं कारणें होऊन शिक्षणाचा चुथडा कसा झाला आणि खऱ्या अर्थानें विद्यार्थिजीवन उध्वस्त कसें झालें हें विहंगम दृष्टीनें वर पाहिलेंच आहे. इंग्रजांचें राज्य असेपर्यंत तसें झालें असलें तर कांहीं नवल नाहीं. परंतु, राज्यदानानंतरहि ही स्थिति सुधारणें तर बाजूलाच राहिलें, उलट अधिक बिकट झाली आहे ही महत्त्वाची गोष्ट आहे. परंतु, त्यांत आश्चर्य करण्याजोगतें कांहींच नाहीं. तिच्या अनेक कारणांचा विचार करण्यापूर्वी कॉंग्रेसनें राज्य-दान हातावर घेतलें त्या वेळची भारताची सामाजिक स्थिति प्रथम पाहूं. कारण, या गोंधळाशीं तिचा प्रत्यक्ष संबंध आहे. भारतामध्यें निरनिराळ्या धर्मांचे व अलिकडच्या पद्धतीनें विचार केला जातो त्याप्रमाणें निरनिराळ्या मानववंशांचे लोक रहातात. त्या सर्वांचा एकनिष्ठेनें भारताच्या लोकशाहींत समावेश व्हावा अशा रीतीनें राज्यतंत्राची घडी बसवावयाची म्हणजे कॉंग्रेसच्या पहिल्या धोरणाप्रमाणें राज्ययंत्र आणि त्यांतील अधिकारी यांनीं या सर्व लोकांहून स्वतःचें असें वेगळें अस्तित्व निर्माण केलें पाहिजे आणि अधिकारी या नात्यानें तरी वेदान्तांत दृष्टान्त येतो त्याप्रमाणें विश्वाचे व्यापार चालवून स्वतः अलिप्त राहणाऱ्या सूर्याप्रमाणें अलिप्त राहिलें पाहिजे. अलिकडे अशा तऱ्हेची भाषा पंतप्रधानांच्या तोंडांत पुष्कळ येत असते. परंतु खुद्द स्वतःला त्यांनाहि तें जमत नाहीं याची साक्ष ज्याच्या अंतःकरणास पटत नसेल असा प्रौढ भारतीय क्वचितच. त्याचें कारण उघड आहे. परंतु या सर्व गोष्टींचा प्रामाणिकपणें खल करण्याकरितां थोडें विषयान्तर करूनहि आधीं दुसऱ्या कांहीं गोष्टी लक्षांत घेतल्या पाहिजेत.

## कायदेशीर मुस्कटदाबी

लोकशाहींत व्यक्तिस्वातंत्र्याला वाव असला पाहिजे म्हटलें तरी तें व्यक्ति-स्वातंत्र्य परस्परांना बाधक होणार नाहीं अशा कांहीं नियमांच्या मर्यादा त्याला घालाव्याच लागतात. आणि त्यांतली एक मर्यादा ही आहे कीं, जी गोष्ट हा सूर्य आणि हा जयद्रथ अशी सप्रमाण जगापुढें मांडतां येत नाहीं ती खरी असल्याचा अथवा घडत असल्याचा बहुजनसमाजाचा अनुभव असला, इतकेंच नाहीं तर तिचा साक्षात्कार होत असला तरी तोंडानें अथवा लेखणीनें तिचा उच्चार करतां येत नाहीं. इतकेंच नाहीं तर लिहिण्यांत अथवा बोलण्यांत त्याच्या उलटच धरून चालावें लागतें. आणि अनुशासनाचा सर्व व्यवहार व राष्ट्राचे लहान-मोठे

सारे कारभार, जें अशा रीतीनें बोललें जातें अथवा लिहिलें जातें तें प्रमाण मानूनच घडत असतें. एका उदाहरणावरून हें समजून येईल. आजकाल नैतिक शिक्षणाच्या नांवानें फार ओरड चाललेली आहे व आस्थाहि उत्पन्न झाली आहे. त्याकरितां लेखनद्वारा आणि भाषणद्वारा सुशिक्षित म्हणविणारे तज्ज्ञ अथवा अनभिज्ञ असे स्त्री-पुरुष आपले विचार प्रकट करीत असतात. व्यक्तिशः त्यांच्या जीवनाची संपूर्ण माहिती समाजाला असते व नैतिकदृष्ट्या त्यांतील कित्येक किती निंद्य असतात हेंहि दिसत असतें. तरी देखील 'या विषयावर बोलण्याचा तुला अधिकार नाहीं' असें त्यांना कोणी म्हणूं शकत नाहीं. इतकेंच नाहीं तर, त्यांचें लिहिलेलें बोललेलें जमेस धरूनच राष्ट्राच्या प्रपंचांत त्याचा उपयोग केला जातो. रंगभूमीवर अथवा चित्रपटांत गेल्यानें स्त्रियांची नीति बिघडते किंवा नाहीं असा वाद जेव्हां उत्पन्न होतो तेव्हां देखील हीच आपत्ति होते. बोलणारी व्यक्ति कशीहि असली तरी लेखकाच्या अथवा वक्त्याच्या गादीवर ती सती सावित्रीच असते, त्यामुळें तिच्या मताला अनुभवाचें प्रामाण्य येतें, परंतु प्रत्यक्ष अनुभव वेगळा असल्यामुळें व्यक्तीला तो अनुभव प्रमाण मानणेंहि दुष्कर होतें आणि राष्ट्राचे व्यवहार तर अशीं मतें प्रमाण मानून ठरविले जातात.

## हिंदु कोण ?

अशी जरी बाह्य स्थिति असली तरी वस्तुस्थितिच व्यक्तीच्या अंतःकरणावर परिणाम करीत असते आणि व्यक्तीचें जीवन घडविण्यास कारणीभूत होत असते. इंग्रजांपासून राज्यदान घेतलें त्या वेळीं भारताची लोकस्थिति काय होती आणि गेल्या दहा वर्षांत तिची अवस्था काय झाली आहे, हें पाहिलें म्हणजे माझें म्हणणें लक्षांत येईल. भारतवर्षामध्यें निरनिराळ्या धार्मिक निष्ठेचे यहुदी, ख्रिश्चन, मुसलमान, पारशी, शीख, आर्यसमाजी इत्यादि समाज असून हिंदु म्हणविणाराहि एक अफाट समाज आहे. परंतु या हिंदुसमाजाचें स्वरूप-लक्षण सांगणारी अशी कायदेशीर व्याख्या कोठेंहि नाहीं. ही अडचण पूर्वींपासूनच आहे. साहित्यसम्राट् केळकरांनाहि 'जो आपणाला हिंदु म्हणवील तो हिंदु' असें म्हणण्याची वेळ आली होती हें प्रसिद्ध आहे आणि स्वराज्यप्राप्तीनंतरहि या परिस्थितींत कांहींहि फरक पडलेला नाहीं. अशी अडचण पडण्याचेंहि कारण सरळ आहे. 'हिंदु-कोडाचें कृष्ण कारस्थान' या माझ्या पुस्तकांत याचा मीं सविस्तर विचार केला आहे. आजची हिंदूबद्दलची कायदेशीर व्याख्या हीच आहे

कीं, कायद्यानें भिन्न म्हटलेले वरील समाज सोडून जे असंख्य नागरिक भारतीय राज्यांत आहेत ते सारे हिंदु.

## आजचा हिंदुसमाज

परंतु या विशाल हिंदु म्हणविणाऱ्या समाजांत निरनिराळ्या निष्ठांचे कमींत कमी तीन वर्ग आहेत. एक ज्यांना सनातनी, बुरसटलेल्या विचाराचे जुनाट इ. विशेषणांनीं कायद्याच्या मर्यादेंत राहून नित्य दुखविलें जातें त्या लोकांचा वर्ग. दुसरा प्रारंभींच्या उताऱ्यांत सांगितलेला इंग्रजी वळणाच्या शूद्रसंस्कृतीच्या लोकांचा वर्ग. यांनाच न्यायमूर्ति वुड्रॉफ, ‘ पाश्चात्त्यांचे मानसपुत्र ’ म्हणतो. यांनीं शहाणपणाची व स्वतंत्रबुद्धीची केवढीहि ऐट केली तरी यांचीं जीवनविषयक सारीं मूल्यें पाश्चात्त्यांपासून उचललेलीं असतात. आणि तिसरा लष्करांतील बाजार-बुणग्यांप्रमाणे, ॲल्डसहक्स्ले ज्यांना पढतमूर्ख ( intelligent fools ) असें म्हणतो त्यांचा आणि निष्ठेच्या दृष्टीनें केवळ गुंड असलेल्यांचा. या तिघांना परस्परांविषयीं खरें प्रेम अथवा खरा जिव्हाळा असणें केवळ अशक्य झालें आहे. यांच्यांत जर कांहीं ऐक्याचा देखावा दिसत असेल तर तो वर शिअरमननें म्हटल्याप्रमाणें भीति आणि लोभ यांमुळेंच आहे. जीवनदृष्ट्या हे एकमेकांत गुंतले असले तरी यांचे खरे हितसंबंध अगदीं भिन्न पडतात आणि वास्तविक पाहिलें तर ख्रिश्चन, मुसलमान इ. प्रमाणें या तिघांनाहि आपआपल्या निष्ठांप्रमाणें जीवन जगण्याची सोय असली पाहिजे. परंतु डॉ. आंबेडकरांसारख्या हिंदुधर्म-द्वेष्ट्यानें घटना बनविली असल्याकारणानें या तिघांचा पृथक् विचार करणें त्यांना अवश्य वाटलें नाहीं, हें उघड आहे. या परिस्थितीचा परिणाम काय झाला आहे हें मी कनिष्काचें उदाहरण घेऊन अन्यत्र दाखविलें आहे. ‘ मतलबापुरते भाऊ, एरव्हीं जीव घेऊं ’ अशी यांची अंतःकरणाची खरी धारणा आहे. आज जी शिक्षणविषयक फार मोठी समस्या पुढें पडली आहे तिच्याशीं या परिस्थितीचा केवढा संबंध आहे हें आपण पुढें पाहूं. परंतु येथें एवढेंच म्हणतों कीं, देशाच्या नैतिक ऱ्हासाची जी ओरड चालली आहे तिच्याशीं हिचा फार दृढ संबंध आहे.

## रशियाचें उदाहरण

येथें यासंबंधानें उत्पन्न होणाऱ्या शंकेचा आधीं विचार करून मग मूळ प्रश्नाकडे वळूं. वरील सर्व लिखाणावरून कोणीहि असें म्हणूं शकेल कीं, नैतिक

दा. क्र. 90230



जीवनाचा आणि तात्त्विक निष्ठांचा काय संबंध आहे ? तत्त्वज्ञानाच्या कचाट्यांत न सांपडतांहि मार्क्सवादासारखें एखादें सुटसुटींत ध्येय घेऊन राष्ट्राचें गाडें खंबीरपणें चालविलें तरी देखील लोकांची नैतिक पातळी इतकी खालावण्याचें कारण नाहीं. आज रशियानें प्रत्यक्ष हा प्रयोग करून दाखविलेला आहे. रशिया-जवळ कोणताहि धार्मिक अथवा आध्यात्मिक निष्ठा नाहीं, तरी देखील रशियासंबंधीं माहिती असणारे आणि रशियांत जाऊन आलेले सर्वजण एकजात तेथील लोकांची नैतिक पातळी फार वरच्या दर्जाची असल्याची ग्वाही देतात. तसें हिंदुस्थानांत कां होऊं नये ? याचें उत्तर असें आहे कीं, रशिया आणि भारत यांच्यामध्यें, त्यांना मिळालेल्या स्वराज्यामध्यें आणि त्यांच्या घटनांमध्यें मानवी राष्ट्रें यापलीकडे कोणतेंच साम्य नाहीं. एक गोष्ट प्रसिद्ध आहे कीं, आज जो रशिया दिसत आहे तो जरी स्वतःला लोकशाही राष्ट्र म्हणत असला तरी त्याचें आजचें स्वरूप अत्याचार आणि दडपशाही यांच्या साधनांनीं बनविलेलें आहे. आजहि या नाहीं त्या रीतीनें तेथें व्यक्तीची गळचेपीच आहे. अशा चिरडलेल्या स्थितींत मानवसमाज जास्त काळ रहाणें केव्हांहि शक्य नाहीं. पाश्चात्य लोकांच्या साम्राज्यवादाचें दडपण ढिलें झाल्याबरोबर या स्थितींत फरक पडल्याशिवाय रहाणार नाहीं.

दुसरें असें कीं, रशियांतील लोकसमाजांची परिस्थिति भारतांतील परिस्थितीहून अगदीं भिन्न आहे. पारतंत्र्यांत पडलें तरी भारतांतील लोक बुद्धिदृष्टीनेंच तर काय परंतु ज्ञान वगैरे सर्वच बाबतींत पाश्चात्यांची बरोबरी करणारे होते हें अनेक पाश्चात्य लेखकांनींच कबूल केलें आहे. आणि मुसलमान, खिस्ती यांच्या सारखे बळेंच घरांत शिरलेले इतर लोक सोडले तर भारतीय लोकांच्या निष्ठांना सुसंगत असें तात्त्विक अधिष्ठान होतें. तशी स्थिति रशियाची नव्हती. मुसलमान व खिस्ती या धर्मांत गूढ भाग काय वाटेल ते असोत आणि थिऑसफिस्ट म्हणतात त्याप्रमाणें तो भारतीय तत्त्वाशीं कितीहि जुळते असोत, बहुजन समाजाच्या उपयोगी पडणारा प्रकट धर्म श्रद्धेवरच उभारलेला होता. एकोणिसाव्या शतकांतील युरोपांत प्रबळ झालेल्या विचारप्रवाहांनीं तो विश्वास बहुजन समाजाचा नाहींसा होऊन विशिष्ट वर्गापुरताच राहिला. अशा निष्ठाहीन प्रजेला सुयंत्रित राखावयाचें म्हणजे शिस्त आणि सामाजिक नीति यांचें वळण पूर्ण असलें पाहिजे. हें वळण द्यावयाचें म्हणजे तें वर म्हटल्याप्रमाणें भय आणि लोभ यांच्या साधनांनींच देणें भाग होतें. त्यांचा

उपयोग रशियांत केवढ्या प्रमाणावर केला गेला याची साक्ष इतिहास देईल. पहिल्या महायुद्धांत व नंतर रशियांत अशी अनवस्था होऊन गेली कीं, अत्याचारी शिस्त आणि मार्क्सवादाचें सुटसुटीत तत्त्वज्ञान यांच्या साह्यानें सुखानें दोन घांस खावयाला मिळणें ही देखील त्यांच्या दृष्टीनें प्रगतीच होती. चार चार वर्षें घरापासून दूर एकसारखे खंदकांत शिपाई राहिल्यामुळें व्यभिचार किती बोकाळला होता आणि त्यामुळेंच अशांतता उत्पन्न होण्याचें भय कसें उत्पन्न झालें होतें याचें वर्णन ' तिखीडॉन ' या कादंबरींत उत्कृष्ट केलेलें पहावयास सांपडतें. अशा स्थितींत केवळ करारस्वरूप असलेली विवाहसंस्था अजीबात उडवून देणें हेंहि एक प्रगतीचेंच पाऊल होतें. एका अतिशय जड माणसाला अभ्यास म्हणून बेमालूम खोटें बोलण्यास सांगितलेलें प्रसिद्धच आहे. स्वामींनीं त्याची थट्टा केली असें वाटून मंडळींनीं जेव्हां त्यांना विचारलें तेव्हां त्यांनीं असें सांगितलें कीं, मी त्याची थट्टा केली नाहीं. तो इतका जड आहे कीं, अशा रीतीनें थोडी बुद्धि चालवील तरी तें इष्टच आहे. म्हणून तें इतरांना इष्ट नाहीं. तशीच ही गोष्ट आहे. रशियाचें अनुकरण करणें आज तरी भारताला इष्ट नाहीं व शक्यहि नाहीं. रशियांत आज जो देखावा दिसतो त्याचें कारण भय व लोभ यांच्या साह्यानें प्रजेंत उत्पन्न केलेली सामाजिक जाणीव (social consciousness) या सामाजिक जाणिवेमुळेंच तेथील नैतिक पातळी उंचावलेली दिसते, तिला स्वयंभू अधिष्ठान नाहीं.

अशा प्रकारची सामाजिक जाणीव राज्यदान घेतलें त्या वेळेलाच वस्तुतः नष्ट झालेली होती, परंतु वर सांगितलेल्या दोन उपयांच्या साह्यानें आणि इंग्रज सत्तेची जी एक जरब होती तिच्यामुळें सामाजिक जाणिवेचा निदान देखावा तरी होता. राज्यदान घेतल्यापासून खरें म्हटलें तर ही स्थिति फार झपाट्यानें सुधारावयास पाहिजे होती. परंतु, अनुभव मात्र अगदीं उलटा आहे. नैतिक पातळी इतकी खालावली आहे आणि सामाजिक जाणीव इतकी नामशेष झाली आहे कीं, सर्वोदयाच्या अनेक कल्पनांनींहि ती सुधारणें कठीण दिसत आहे.

## गांधीजींचा अनुताप

याचें कारणहि उघडच आहे. विहिरींतच नाहीं तर पोहोऱ्यांत येणार कुठून ? ज्यांनीं हें राज्यदान घेतलें त्यांच्याच नैतिक अधःपाताचें शल्य त्यांना पितृस्थानीं असलेल्या गांधीजींच्या अंतःकरणाला किती मरणप्राय दुःख देत होतें हें सुप्रसिद्धच

आहे. असें म्हणण्यास हरकत नाहीं कीं, स्वराज्यांतील ढिल्या कारभारामुळें ही जाणीव नष्ट करण्यास अनेक प्रकारांनीं उलट सरकारच मदत करीत आहे. भारताचे पंतप्रधान एखाद्या कृष्णम्माचार्यांची स्फुंदून स्फुंदून बोळवण करितात अथवा सूर्यप्रकाशासारख्या स्वच्छ असलेल्या मुंबईच्या गोळीबार-प्रकरणासारखीं असलेलीं प्रकरणें ढुंगणाखालीं घालून एखादा मुरारजी पंतप्रधान होण्याची आकांक्षा धरितो हें कशाचें द्योतक आहे ? एक प्रकारें लोकांच्या नैतिक अधःपाताची आकांक्षा असणाऱ्या इंग्लिश सरकारचें देखील धोरण एका बाबतींत प्रशंसा करण्याजोगें आहे. आंत कांहीं असलें तरी कोणतीहि हयगय न करतां शिस्तीचा देखावा त्यांनीं उत्कृष्ट राखला होता. गुन्हे आणि शिक्षा यांचें प्रमाण काय असावें हा विनयशास्त्रांतील मोठा प्रश्न जरी बाजूस सोडला तरी एक गोष्ट निर्विवाद आहे. समानशीलाच्या लोकांना जरब बसेल एवढी ती शिक्षा कडक असलीच पाहिजे. नाहीं तर तिची थट्टा होऊन सामाजिक जाणिवेचा अंत्यविधीच होतो.

## नागपूरचा अनुभव

या गोष्टीचें प्रत्यंतर पहाण्यास लांब देखील जावयास नको. नुसत्या नागपूर शहराचा अनुभव पाहिला तरी शिक्षण आणि सत्ता या सामाजिक जाणिवेला नष्ट होण्यास मदत कशी करतात तें ध्यानांत येईल. अप्रस्तुत विषय असल्यामुळें जास्त विस्तार न करतां एक लहानसें उदाहाण घेऊन विषयाकडे वळूं.

सायकलवर बसणाऱ्यानें रात्रीं घंटी व दिवा ठेवलाच पाहिजे असा नियम. परंतु या नियमाचें परिपालन किती केलें जातें हें नागपुरांतील एखादें शेंबडें पोरहि सांगूं शकेल. विशेषतः नागपुरांतील म्युनिसिपालटीच्या दिव्यानें आपसांत तह करून पुष्कळ ठिकाणीं दोन दिव्यांतल्या अंधारांत एक ' बफर स्टेट ' राखलेलें असतें आणि दिवेहि मर्जीप्रमाणें वाटेल तेव्हां अदृश्य होतात आणि स्वच्छंदानें पुनरागमन करितात त्यामुळें जनतेला केवढा उपसर्ग होतो, लहानसहान अपघाताची तर दादच घेतली जात नाहीं, परंतु मोठाले अपघात नित्यशः किती होतात हें वर्णन करून सांगण्यास एखाद्या ' भाव्यां ' चीहि गरज नाहीं इतकें तें परिचयाचें आहे. नवलाची गोष्ट अशी आहे कीं, अशा रीतीनें सामाजिक जाणिवेला धाब्यावर बसविणाऱ्या लोकांत अडाणी समजल्या जाणाऱ्या लोकांपेक्षां सुशिक्षित म्हणविणारे लोकच जास्त आढळतात. गुन्हा चुकून झाला अथवा मुद्दाम केला तर स्वतःहून अधिकाऱ्यास तें जाऊन सांगणारे लोक ज्या ठिकाणीं आढळा-

वयाचे त्याच ठिकाणीं सुशिक्षित म्हणविणाराच तर काय पण सुशिक्षण देतो म्हणणाराहि माणूस एखादा रुपया खिशांत ठेवून घंटीशिवाय किंवा दिव्याशिवाय निर्धास्तपणें खुशाल सायकल चालवितो. त्यांत त्याला यत्किंचित् देखील शंका अथवा शरम वाटत नाहीं, हें कशामुळें होतें? वर्षांतून कांहीं ठराविक दिवशीं होणारें पोलिस तपासणीचें नाटक अंगवळणीं पडलेलें असतें व फारच झालें तर थोड्याशा रुपयांवर आपण सुटून जाऊं ही खात्री असते. एक क्षुल्लक बाब म्हणून या गोष्टींकडे दुर्लक्ष केलें जातें असें म्हणावें तर जिवानिशी जाण्याचा संभव. अशा वेळीं खरें पाहिलें तर सायकल जप्त करण्यासारखी एखादी कडक शिक्षा कठोर वाटली तरी खरी जरब बसविणारी होते. नैतिक र्‍हासाला साह्य-करणारें इंग्लिश लोक देखील हें तत्त्व ध्यानांत ठेवून वागणारे होते, म्हणून लोकांना जरब वाटत होती व भीति वाटत होती. आज तर एखाद्या सामान्य कर्मचाऱ्यापासून तों मुरारजी देसायापर्यंत कोणी ना कोणी तरी आपला पाठीराखा असल्याचा भरंवसा आहेच. शिवाय आजच्या नाण्यांना पूर्वीच्या रुपयासारखा आवाजहि नसतो. ते स्वतःहि आवाज होऊं देत नाहींत आणि दुसऱ्याचाहि होऊं देत नाहींत.

राज्यदान घेतलें त्या वेळेला विद्यार्थी कोणत्या स्थितींत होता आणि शिक्षणाची काय अवस्था होती याची थोडक्यांत कल्पना आतांपर्यंत केलेल्या निवेदनावरून कळून येईल. हें निवेदन अर्थातच अत्यंत धांवतें आहे. हल्लीं या प्रश्नाला जीं निरनिराळीं अंगें उत्पन्न झालीं आहेत त्या दृष्टीनें तें केलेलें नाहीं. हल्लीं या प्रश्नाला मुख्य तीन अंगें आहेत. एक, शिक्षणशास्त्र, मानसशास्त्र, आरोग्य-शास्त्र, समाजशास्त्र इ० निरनिराळ्या शास्त्रांच्या साह्यानें तात्त्विक विचार. दुसरें, या तात्त्विक विचारांतून जीं मूलभूत तत्त्वें निश्चित होतील तीं प्रत्यक्षांत कशीं उतरवावयाचीं. म्हणजे त्या दृष्टीनें बहुविध अंगांच्या आजच्या शिक्षणाचें स्वरूप काय असावें ? या प्रश्नालाच डॉ. पिरेझ यांनीं गुणात्मक (qualitative) असें म्हटलें आहे. आणि तिसरें, भारत-राज्याच्या अफाट अशा बहुरंगी नागरिकांत या शिक्षणाचा प्रसार शक्य तितक्या झपाट्यानें आणि शक्य तितक्या सर्वव्यापी स्वरूपानें कसा करावयाचा. वास्तविक केव्हांहि शिक्षणाचीं हीं तीन अंगें असणारच. परंतु परकी सत्तेला शिक्षणाचा नुसता देखावाच करावयाचा असल्यामुळें त्यांचा खरा विचार करण्याचें कारणच नव्हतें. आणि सर्व भारत

साक्षर करावयाचा अशी जरी त्यांची घोषणा असली तरी त्याकरितां घिसाडघाई करण्याचें त्यांना कांहींच कारण नव्हतें. नाहीं म्हटलें तरी या गोष्टीचाहि कांहीं थोडा बहुत फायदा मिळालाच. परंतु राज्यदान घेतलें ती परिस्थितीच अशी होती कीं, हे सारे प्रश्न आणखीच बिकट व्हावे. कितीहि परकी बुद्धि असली तरी गांधीजींच्या मनांत भारताविषयीं कळवळा होता, त्याच्या कल्याणाविषयीं आस्था होती. त्यामुळें त्यांच्या लक्षांत प्रथम कोणती गोष्ट आली असेल तर ती ही कीं, स्वराज्यप्राप्तीच्या अनेक चळवळींचा अपरिहार्य परिणाम म्हणून भारतीय नागरिकांचा दर्जा निरनिराळ्या अनेक रीतींनीं फारच खालावला आहे. राज्य-ग्रहणानंतर हल्लींच्या जागतिक ओघास अनुसरून भारत-राज्याचें स्वरूप लोक-शाहीचेंच असणार हें सिद्धच होतें. अशी लोकशाही तत्काळ समर्थ व्हावयाची अथवा अनेक प्रकारच्या विषम परिस्थितीला तोंड देऊन सुखरूपपणें त्यांतून पार पडावयाचें म्हणजे तिचा घटक खऱ्या अर्थानें सुशिक्षित असला पाहिजे. नाहीं तर डॉ० लिंकनें म्हटल्याप्रमाणें अनिष्ट गोष्टींना मात्र प्रोत्साहन मिळून नको तो प्रसंग लवकरच यावयाचा. ( The strength of democracy lies in the freedom and determination of its millions of independent personalities, not in the all-wise planning of the the few. Our leaders, instead of inspiring the millions to use their powers and to rely on themselves spread intellectual doctrines which encourage them to excuse themselves, to blame such abstractions as business or the economic system and to wait for the cushions of security. What parents in an excusable love, have, too often, done to their children, the father of a nation, prompted by academic fallacies are now doing for their countrymen. — *Ibid, p.* 147 ) परंतु भारतांत तर अशी स्थिति होती कीं, खऱ्या अर्थानेंच तर काय पण खोट्या अर्थानें देखील शेंकडा दहा माणसें सुशिक्षित निघतील. या परिस्थितीमुळें अजूनहि अशी अवस्था आहे कीं, भारताचा नागरिक लोकशाहीच्या रंगणांत अद्याप खऱ्या अर्थानें उतरलाच नाहीं. मुदलियार-कमिशननें म्हटल्याप्रमाणें सुशिक्षित म्हणविणाऱ्या या कांहीं व्यक्तींच्या पलीकडे इतरांची, लोकशाहीचा सर्वांगीण

विचार करून स्वतःच्या वागणुकीचा निर्णय करण्याची, पात्रताच आलेली नाहीं. त्यामुळें मुदलियार कमिशननें-म्हटल्याप्रमाणें त्यानें केलेलें मतदान म्हणजे लोकशाहीचें विडंबनच आहे. (But in a democracy if it is anything more than the thoughtless exercise of the whole—an individual must form his own independent judgement on all kinds of complicated social, economic and political issues, to a large extent, and decide his own course of action. *p*. 23–24) कायद्याच्या तंत्राप्रमाणेंच जरी गोष्ट उघड करतां येत नसली तरी मतदानाच्या प्रसंगीं केवळ तीन रुपयांवरच मत मिळूं शकतें हा अनुभव कोणास नाहीं ? अशी स्थिति असल्यामुळें राजकारणामध्यें नागरिकाच्या नांवानें पक्षच उतरणार आणि पक्ष म्हटला कीं, तो, वर डॉ. लिंकनें म्हटल्याप्रमाणें, कांहीं ठराविक व्यक्तींच्या प्रेरणेनेंच चालणार ही सिद्ध गोष्ट आहे. शक्य तोंवर या गोष्टींपासून राजकारण अलिप्त असावें म्हणून कॉंग्रेसजनाच्या अधःपाताची प्रांजळपणें घोषणा करून, कॉंग्रेसच मोडून टाकावी आणि पक्षातीत असलेल्या व्यक्तींच्या प्रोत्साहनानें राष्ट्रकार्यें चालावींत असें गांधींनीं सुचवून ठेविलें आहे. परंतु त्यांची कळकळ इतरांना कोठून असणार ? त्यांनीं नालायक ठरविलेल्या कॉंग्रेसपक्षाच्या हातीं सर्व सूत्रें आलीं आणि खऱ्या लोकशाहीचा उदय होण्यापूर्वीच पक्षशाही सुरू झाली.

## परकीय अंतःकरणाचे पुढारी

पक्षाच्या हातीं सत्ता आल्याबरोबर कोणालाहि काय आपलें पद चिरस्थायी व्हावें असें वाटणें मनुष्यस्वभावाला धरून आहे. त्याकरितां जी काळजी घेतली गेली तिचाहि परिणाम या शिक्षणावर झाला आहे. अर्थात् त्या बाबतींत केवळ कॉंग्रेसच दोषी आहे असें नाहीं. राजकीय क्षेत्रांत जिवंत असणारे इतर पक्षहि सहभागी आहेत. अनेक प्रकारचें मतवैचित्र्य असतां आणि पक्षाच्या जोरावरच राजकारण निभवावें अशी वस्तुस्थिति असतां, या बाबतींत मात्र सर्वांचें सहकार्य कसें झालें तें पहाण्याजोगें आहे. कांहीं अपवाद सोडले तर या निरनिराळ्या शक्तींना जेथून प्रेरणा मिळते त्या बहुतांश सर्व व्यक्ती, पूर्वी सांगितल्याप्रमाणें पाश्चात्यबुद्धीच्या आणि न्या. वुड्रॉफ ज्यांना पाश्चात्यांचे मानसपुत्र म्हणतो, त्या प्रकारच्या आहेत. व्यक्तिशः त्या कितीहि थोर असल्या, राष्ट्राच्या कल्याणाची कळकळ आणि त्याकरितां त्याग करण्याची त्यांची तयारी केवढीहि मोठी असली, तरी

खऱ्या भारतीयतेपासून ते फार दूर आहेत. कारण त्यांच्या साऱ्या विचारसरणी आणि जीवनविषयक सर्व प्रकारचीं मूल्यें यांना केवढेहि भारतीय मुलामे दिले असले तरी आंत केवळ पाश्चात्यच आहेत. सुमारें वीस वर्षांपूर्वी स्वतंत्र जपानविषयीं विल्यर्ड प्राइसनें असें लिहिलें होतें कीं, 'जपानी मनुष्य बाह्यांगांत पाश्चात्यांचें अनुकरण करतांना दिसला, तरी अंतरंगांत पूर्णपणें जपानीच आहे, कारण जीवनाच्या सर्व बाबतींतील त्याचीं मूल्यें अस्सल जपानीच आहेत.' आज देखील पुष्कळ अंशीं तिथें अशी स्थिति असावीसें वाटतें. कांहीं वर्षांपूर्वी एका इस्लामी भगिनीच्या नेतृत्वाखालीं भारतीय स्त्रियांचें एक कमिशन जपानला गेलें होतें. त्याविषयीं माहिती देतांना त्या बाईनें असें लिहिलें होतें कीं, जपानी स्त्री-पुरुष घराबाहेर वावरत असतांना सर्वप्रकारें पाश्चात्यांचें अनुकरण करीत असले तरी त्यांच्या घरांत सर्व प्रकारें अस्सल जपानच दिसून पडतो. पाश्चात्य पोशाख घालून ते आपल्या घरांत देखील प्रवेश करीत नाहींत. आपण बाहेर जोडे ठेवितों त्याप्रमाणें ते बाहेर पोशाख काढून ठेवून जपानी किमोनो व गवती सपातांनीं घरांत प्रवेश करतात. सुशिक्षित म्हणविणाऱ्या सर्व भारतांत बहुंशीं याच्या उलट परिस्थिति आहे. आणि नुसती व्यवहाराच्याच दृष्टीनें नव्हे तर मूल्यांच्या दृष्टीनेंहि ती अशीच उलट आहे.

## उसनवारी व घिसाडघाई

या वर्गातून पक्षप्रणोते तयार झालेले, तेव्हां राज्याच्या घटणेसंबंधींहि त्यांना स्वतंत्र बुद्धि कोठून असणार? तेव्हां तिच्यासंबंधाच्या सर्व कल्पनाहि त्यांना अमेरिकेसारख्या एखाद्या राष्ट्राकडून उसन्या घेणेंच भाग होतें. मग सर्वच प्रकारांनीं तें राष्ट्र सदृश आहे का विसदृश आहे याचा तरी विचार करण्याचें काय कारण होतें? अमेरिकन राज्यघटना ही तेथें आज पावणे-दोनशें वर्षांच्या जीवनक्रमांत स्वाभाविकपणें परिणत झाली आहे, म्हणून तिचे इष्ट परिणाम दिसतात. उदा. स्वतंत्र झाल्यापासून सुमारें नव्वद वर्षेंपर्यंत अमेरिकन स्त्रियांना मतदानाचा हक्क नव्हता. सन १८६९ च्या सुमाराला केव्हां तरी तो मिळाला. परंतु भारतांत, जागतिक पेंचांत सांपडल्यामुळें इंग्लंडला ध्यानींमनीं नसतां जसा राज्यदानाचा 'ट्रान्स्फर सीन' करावा लागला, तशाच साऱ्या इथें गोष्टी एकदम घडल्या पाहिजेत, अशी येथें दृढ समजूत झाल्यामुळेंच कीं काय, जवळजवळ आजच्या अमेरिकन घटनेची नक्कल असलेली घटना एकदम पसंत करण्यांत आली आणि

तिला अनुसरून सर्व प्रकारच्या अपक्व परिस्थितींत प्रौढ मतदान ( adult franchise) भारताच्या बोकांडीं बसलें. याहि परिस्थितीचा परिणाम शिक्षणावर कसा झाला हें पहाण्याजोगें आहे.

## चार दुष्परिणाम

जास्त खोलांत न शिरतां वरवर जरी पाहिलें तरी असें दिसून येतें कीं, शिक्षणाच्या बाबतींतहि अमेरिकेचेंच विचारहीन अनुसरण होत आहे. अमेरिकेमध्यें आज सर्व प्रकारची सुस्थिति असतां देखील तेथील तरुण नैतिक दृष्ट्या किती अधःपतित व बेजबाबदार होत चालले आहेत याचीं वर्णनें मधूनमधून आपणांस वाचावयास मिळतातच. हीं नुसतीं वर्णनेंच नसतात तर आंकडेवारीहि असते. हा कशाचा परिणाम आहे याचा देखील विचार न करतां आम्ही तेंच शिक्षण जसेंच्या तसेंच उचलीत आहोंत. दुसरा अनिष्ट परिणाम असा झाला आहे कीं, प्रौढ मतदान स्वीकारण्यांत जशी घिसाडघाई झाली आहे, तशीच घिसाडघाई शिक्षणाच्या बाबतींतहि होत आहे. कारण, प्रौढ मतदान स्वीकारणारें भारतासारखें जागतिक राष्ट्रांच्या मेळाव्यांत डौलानें वर मान करणारें राष्ट्र आणि त्यांत साक्षरतेचें प्रमाण जेमतेम शेंकडा दहा! ही परिस्थिति लांच्छनास्पद आहे. तेव्हां कोणीकडून तरी सारें राष्ट्र झपाट्यानें सुशिक्षित बनविण्याची आवश्यकता आहे. आणि तेवढ्याकरितां शिक्षणाचा वेग वाढविणें अवश्य आहे. याचा परिणाम प्रथमतः माध्यमिक शिक्षणावर होऊन त्यानें खालपासून वरपर्यंत साऱ्याच शिक्षणाचा दर्जा किती खालावला आहे याची जाणीव आतां राष्ट्रास सुदैवानें होऊं लागली आहे. घरीं-दारीं, सभांतून, वृत्तपत्रांतून, खाजगी रीतीनें अथवा सरकारी रीतीनें निरनिराळ्या कमिशनच्या स्वरूपांत आज जी चर्चा होत आहे तिच्यावरून सहज दिसून येईल. इंग्रज लोकांनीं जें राजनैतिक तत्त्व म्हणून धोरण स्वीकारलें त्याचा सखोल विचार न करतां तेंच पुढें चालवून सारें राज्य जलदीनें शिक्षणसंपन्न करण्याच्या मार्गांत येथें मोठी अडचण अशी आहे कीं, Backward classes म्हणून ज्यांना म्हणण्यांत येतें, त्यांचा प्रश्न येथें इतका मोठा आहे कीं, त्यांच्या शिक्षणाकरितां होणारा खर्च आणि त्या शिक्षणाचें स्वरूप या दोन्हीहि रीतींनीं जगांतील इतर कोणत्याहि ठिकाणापेक्षां तो दुर्घट झाला आहे.

तिसरा दुष्परिणाम साहजिकच असा झाला आहे कीं, हल्लींच्याहि शिक्षणांत बहुशीं ॲबे डु बॉयच्या म्हणण्याप्रमाणें परंपरेविषयीं अनादर (dispise) उत्पन्न

करण्याचेंच सामर्थ्य असल्यामुळें आणि जीवनविषयक कोणत्या तरी सखोल तत्त्वज्ञानाच्या अभावामुळें व नवीन निष्ठा उत्पन्न करण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें साक्षरतेनें आलेल्या सुशिक्षिततेच्या दंभानें पूर्वी सांगितल्याप्रमाणें अंतःकरणाच्या दृष्टीनें पाशवी वृत्तींचेंच प्राबल्य त्यांच्या ठिकाणीं साहजिकच वाढत आहे.

चौथा दुष्परिणाम असा आहे कीं, राजकारणाप्रमाणेंच शिक्षणक्षेत्रालाहि प्रचाराचें स्वरूप प्राप्त झालें आहे. राजकीय क्षेत्रांत अग्रेसर असलेल्या पक्षांना आपलें स्थान नेहमींच स्थिर असावें असें वाटणें स्वाभाविकच आहे. हें स्थान स्थिर असणें हें लोकशाहींत मतावरच अवलंबून असतें. तेव्हां आपल्या मताचा प्रसार जितका होईल तितका करण्याची पराकाष्ठा करणें त्यांना आवश्यक होतें आणि ही गोष्ट जास्तींत जास्त साध्य होण्यास बाल व तरुण यांच्यासारखें दुसरें कोणतें क्षेत्र असणार ? त्यामुळें भाषेची आतषबाजी केवढीहि केली तरी अखेरीस शिक्षण हें एक प्रचारसाधनच बनलें आहे, हें लक्षांत आल्याखेरीज रहात नाहीं. सामाजिक शिक्षण (social studies), 'बेसिक' शिक्षण इ. परिभाषा जी अलीकडे शिक्षणक्षेत्रांत ऐकूं येत आहे, तिचें वास्तविक स्वरूप हेंच आहे.

## सामाजिक शिक्षणाचें बिंग

सामाजिक शिक्षण या विषयावर खरें पाहिलें तर जास्त खोलांत जाऊन विस्तृत लिखाण व्हावयास पाहिजे. येथें अर्थातच तसें करतां येणार नाहीं. परंतु थोडक्यांत असें म्हणतां येईल कीं, जेम्स हेमिंगनें म्हटल्याप्रमाणें सामाजिक शिक्षणाचा हेतूच मुळीं निष्ठांचें उन्मूलन करून ध्येयहीन जीवन बनविण्याचा आहे.

( As Prof. Ashby of Manchester University points out to challenge to education we must today deliberately prepare our children to insecurity and instability. *Social Studies in Secandory Schools, — p.* 16–17. आज जें सामाजिक शिक्षणाला स्वरूप प्राप्त झालें आहे त्याच्या पोटांत याच्यापेक्षां आणखी कांहीं पाप आहे. जेम्स रॉसनें म्हटल्याप्रमाणें कोणत्याहि राष्ट्रांत आजकाल राष्ट्राधिकारी राष्ट्राचें तत्त्वज्ञान आणि राष्ट्राचें शिक्षण हीं दोन्हीहि राजकारणास अनुकूल पडेल अशाच रीतीनें नियन्त्रित करीत असतात. सामाजिक शिक्षणाच्या पोटामध्यें ज्ञानप्रसराऐवजीं राजकारणाच्या चौकटींत बसतील अशीं मतें बाळगणारे अनुयायी उत्पन्न करण्याचेंच पाप असतें. हें फेरिस्टरनें थोडक्यांत सुंदर सांगितलें आहे. तों असें

म्हणतो कीं, शिक्षणाचा खरा हेतु वास्तविक ज्ञानापेक्षां आपणांस इष्ट अशा दिशेनें विद्यार्थ्यांच्या अंतःकरणाची घडण घडविणें हाच आहे. ( Social studies are part of the apporoach to modern education, the aim of which is the formation of standards, attitudes, ideals and interests rather than the accumulation of factual information. — *Intraducing Social Studies,* — *P.* 30.) समाज-शिक्षणाकरितां म्हणून आज जीं भिकार पुस्तकें शाळाखात्यांत मान्य केलीं जात आहेत त्यावरून देखील फेरिस्टरचें म्हणणें बरोबर असावेसें वाटतें.

## स्वतंत्र बुद्धि व व्यासंग यांचा अभाव

पारतंत्र्याच्या काळांत लिहिले गेलेले हिंदुस्थानचे इतिहास एका विशिष्ट दडपणाखालीं स्वतंत्र बुद्धीच्या अभावानें लिहिले गेले हें तर आतां श्री. कन्हैयालाल मुनशीसारख्यांनाहि पटूं लागलें आहे. आतां स्वातंत्र्यांत खरें म्हटलें तर इंग्रज लोकांनीं कांहीं अज्ञानानें, कांहीं मतलबीपणानें प्रसृत केलेल्या कल्पना बाजूला सारून स्वतंत्रप्रज्ञेच्या व्यासंगी विद्वानांकडून संशोधित केलेले संस्कार बालमनावर होतील असे ग्रंथ सुद्दाम तयार करण्याची आवश्यकता आहे. परंतु ज्यांनीं कधीं संशोधनाचें तोंडहि पाहिलें नाहीं आणि इतिहासाचा सखोल अभ्यास देखील केलेला नाहीं, अशांच्या हातांत हें समाजशिक्षण गेलें म्हणजे त्याचाहि प्रकार ' शिकविला बोले रावा जैसा ' असा होणार हें उघडच आहे. मग तीं शालेय पुस्तकें लिहिणारे घोड्यांचे वैद्य असोत अथवा हजार बुद्धीचीं माणसें असोत ! उदा. हिंदुस्थानचा प्राक्कालीन इतिहास हा वस्तुतः सर्व प्रकारच्या तर्कशुद्ध विचारसरणींना बाजूला सारून पाश्चात्यांनीं कांहीं मूर्खपणानें, कांहीं परकीयांना सुलभ असलेल्या अज्ञानानें, कांहीं शहाणपणाच्या घमेंडीनें आणि कांहीं मतलबीपणानें केलेला निव्वळ कल्पना-विलास आहे. तो तर्कशुद्ध पायावर पुनः बसविला पाहिजे व तसें करतांना आपली स्वतंत्र वाढ लक्षांत ठेवून पाश्चात्य इतिहासाच्या मोडींत त्याला कोंबण्याचें व्यसन टाकून दिलें पाहिजे, असें आतां रवीन्द्रनाथ टागोरसारख्या आपल्याकडील व विन्टरनिट्झसारखे अनेक पाश्चात्य अभ्यासकहि म्हणूं लागले आहेत, हें प्रसिद्ध आहे. प्रो. मॅक्समुल्लरची सृष्टिपूजेची कल्पना ही किती खुळचट आहे हें न्यायमूर्ति वुड्रॉफनें व मी माझ्या स्वतःच्या पुस्तकांत दाखविलें आहे. इतकेंच नाहीं तर ज्यांनीं या कल्पना काढल्या

त्यांना देखील स्वतः ही गोष्ट लक्षांत आली होती. खुद्द मॅक्समुल्लरनेंच पुढील पिढीला आपल्या कित्येक कल्पना अप्रमाण ठरवाव्या लागतील असें म्हटलें आहे आणि कोणत्या कुयोगावर भाषाशास्त्राची व वंशशास्त्राची सांगड घातली गेली म्हणून खेद प्रदर्शित केला आहे. परंतु शिक्षणाधिकाऱ्यांना त्याची दखल घेण्याचें काय कारण आहे? त्यामुळें इतिहास-लेखन कसें झालें आहे हें पहावयाचें झालें तर उदाहरण म्हणून घोडवैद्यांचा 'सामाजिक जीवनाचा अभ्यास' पहा. (वर्ग ९ व १०) पाश्चात्यांनीं धर्माच्या उत्पत्तीविषयीं अनेक मूर्ख कल्पना केल्या आणि सर्व भारतीय परंपरांना लाथाडून ऋग्वेदांतून हवींतशीं अनुमानें काढलीं. याविषयींची पोपटपंची सदर पुस्तकांत पहिल्याच कांहीं पानांत आढळून येईल. परंतु त्याबरोबरच इंग्रजी संस्कृतींत वाढलेला म्हणूत जो वर्ग सांगितला त्यांच्या मतांचा प्रचारहि आढळून येतो. त्याचें ठराविक उदाहरण म्हणून गौतमबुद्धाचें देतां येईल. महावीराच्या आणि गौतम बुद्धाच्या काळीं धार्मिक व सामाजिक ऱ्हास झाला होता, ब्राह्मणांचें प्राबल्य फार झाल्यामुळें खालच्या वर्गातील लोकांना धार्मिक शिक्षण मिळत नसे, यज्ञाच्या नांवाखालीं पशुहत्येचा कळस झाला होता आणि या सर्वांमुळें आर्य धर्माचीं नीतिमूल्यें काजळलीं होतीं असें बिनदिक्कतपणें मुलास शिकविलें जातें. याच्यावर येथें कांहीं जास्त लिहिणें शक्य नाहीं. 'युगवाणीं' तील माझ्या लेखांत (डिसेंबर, ५७) न्यायमूर्ति नियोगींच्या लेखाचें परीक्षण करतांना मी याचा जास्त विचार केला आहे. परंतु घोडवैद्यांना त्याचा विचार करण्याची काय गरज? आणि शिक्षणाधिकाऱ्यांना तरी याविषयीं जास्त दक्षता घेण्याचें काय कारण?

## प्रेषित विनोबा

'बेसिक' शिक्षणाचेंहि असेंच आहे. वर सांगितल्याप्रमाणें सर्व प्रकारची घिसाडघाई तर त्याच्यांत आहेच आणि पुनः सर्वोदयाचें तंगडें त्याच्या पायांत पुनः अडकवून दिलें आहे. असेसमेन्ट कमेटीनें स्पष्टच म्हटलें आहे कीं, विद्यार्थ्यांची कांहीं धोरणानें तयारी करणें आणि सर्वोदयाचा प्रसार करणें हें त्या चळवळीचे मुख्य हेतू आहेत. आणि या सर्वोदयाचा दादला प्रेषितपणाचें वारें अंगांत आणणारे विनोबा भावे आहेत; हें लक्षांत ठेवलें म्हणजे पुरे आहे. ते संत तर आहेतच, बुद्धिमान्‌हि आहेत, गीतेंत व्यासांनीं केलेली चूक सुधारून घेण्यापासून तों बायकांना बंडाची स्फूर्ति देऊन भारतांतील उरल्यासुरल्या गृहसौख्याचा

नाश करण्यापर्यंत सर्व प्रकारचें आदेश त्यांना होतात! ('विनाशाय च दुष्कृताम्' ही व्यासांची घनगंभीर गर्जना पहा आणि गीताईत तिचेंच विनोबांनीं मुरकत मुरकत केलेलें 'दुष्टां दूर करावया' हें रूपांतर पहा.) हें सर्व पाहिलें म्हणजे 'बेसिक' शिक्षणाच्या तात्त्विक स्वरूपाबद्दल जास्त लिहावयास नको.

## मुख्य कारण तत्त्व दृष्टीचा अभाव

या सर्व गोंधळाचा परिणाम काय झाला आहे हें अन्यत्र थोडक्यांत पहावयाचें असेल तर डॉ. प्र. न. जोशी यांचे 'वसंतां'तील लेख पहा. (जुलै व ऑगस्ट, १९५८) या साऱ्या हृदयविदारक परिस्थितीचें मोठें हृदयस्पर्शी चित्र त्यांनीं रंगविलें आहे. हल्लींच्या शिक्षणाच्या समस्यांचें हें सारें मूळ लक्षांत ठेवून त्याच्या प्रत्यक्ष प्रयोगाकडे आतां आपण वळूं. या प्रत्यक्ष प्रयोगांतील अडचणींचें स्वरूप लहान–मोठ्या अनेक लेखकांनीं विशद केलें आहे. थोडा विचार केला तर असें आढळून येईल कीं, त्यांचीं मुख्य कारणें दोनच आहेत. एक सर्व-प्रकारची विसाडघाई आणि दुसरें वैयक्तिक जीवनांतलीं तात्त्विक ध्येयहीनता-आधींच इंग्रजांच्या कौटिल्याला बळी पडलेल्या राष्ट्रांतील तरुणांचा वर सांगितल्या-प्रमाणें सर्व प्रकारच्या राष्ट्रीय आंदोलनास हवा तसा उपयोग करून घेतलेला असल्यामुळें दोन-चार पिढ्यांच्या उत्तरोत्तर ऱ्हासांत जीवनाकडे पहाण्याचा तात्त्विक दृष्टिकोनच नाहींसा झाला. आज तरुणांच्या शिक्षणाचे प्रश्न सोडविणारे प्रौढ-देखील याच परंपरेंत प्रगत झालेले, तेव्हां शाब्दिक अवडंबर केवढेंहि माजविलें तरी आडांतच नाहीं तर पोहोऱ्यांत येणार कुठून? हल्लींच्या विद्यार्थ्यांकडे नुसतें पाहिलें तरी एक बेछूट बेदरकार, उडाणटप्पू प्राणी पहात असल्यासारखें वाटतें. परंतु तो तरी काय करील? पोषाखासारख्या साध्या गोष्टीपासून देखील त्याच्या गुरूचाच आदर्श त्याच्यापुढें असतो. राष्ट्रीय आदर्शच तसा झालेला आहे! अधिकारदर्शनाचे कांहीं विशेष प्रसंग सोडले तर एखाद्या लहान-सहान अधिकाऱ्या-पासून तों थेट पंतप्रधानापर्यंत पोषाख पाहून पूर्वीच्या मवाल्याची आठवण होणार नाहीं तरच नवल!!

## पंचवार्षिकांचा जुलूम

पूर्वी निर्देश केल्याप्रमाणें शिक्षणाच्या बाबतींतील सर्व अडचणी तीन प्रकारच्या आहेत. त्यांतील आर्थिक अडचणी सहज कमी करतां येतील. मात्र तेवढ्याकरितां भारतांतील सर्व प्रजेला एकदम सुशिक्षित करून घेणें आणि

अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नोंः दिः ...

मोठमोठ्या योजना करून एकदम वैभवसंपन्न करणें हे दोन झटपट रंगारी नाहींसे केले पाहिजेत. आणि प्रत्येक बाबतींत पाश्चत्यांचें अनुकरण करणें सोडून दिलें पाहिजे. भारतांतील शिक्षणासंबंधी न्यायमूर्ति वुड्रॉफनें असें म्हटलें आहे कीं, विटा आणि सीमेन्ट यांनाच हिंदुस्थानांत शिक्षण समजलें जातें. यांना दिलेलें महत्त्व किती वास्तविक आहे हा प्रश्न जरी बाजूस ठेविला तरी असें म्हणतां येईल कीं, असें महत्त्व देऊनहि फारसें अडण्याचें कारण नव्हतें. या बाबतींत खरा अडथळा जर कोणाचा होत असेल तर पंचवार्षिकासारख्या अनेक लहान मोठ्या योजनांचा. या योजनांच्या निमित्त्यानें उत्पन्नांतून अथवा कर्जातून कोटयावधि रुपयांच्या रकमा अलग काढल्या जातात. त्यामुळें अर्थातच राष्ट्राच्या इतर संसारांत अभाव उत्पन्न होतो. या रकमा मंजूर करण्यांत देखील कांहीं चुका असण्याचा संभव आहे. परंतु राष्ट्रांतील त्या त्या विषयांतील अनेक तज्ज्ञांना देखील त्यांविषयीं विचार करतां येत नाही. कारण त्यासंबंधीं त्यांचा सल्ला घेण्याची गरजच नसते. वाटेल तशीं मतें मिळवून माणूस वर जातो, पक्षाच्या धोरणानें अधिकारी होतो आणि अधिकारी झाला म्हणजे तो सर्वज्ञ होतो. मग त्या विषयाशीं त्याचा पूर्वी परिचय असो किंवा नसो. अशा सर्वज्ञ बुद्धिमानांनीं घटनेच्या नियमांचें कवच घेऊन केलेली प्रत्येक गोष्ट बिनचूकच असते !

## अजूनहि गुलाम वृत्तीच

विधिमंडळांत निवडून गेल्याबरोबर निरनिराळे प्रतिनिधि समाजांतील निरनिराळ्या लोकांना जे धडे अधिकारवाणीनें देऊं लागतात, ते पाहिले म्हणजे कोणासहि आश्चर्य वाटेल. शिक्षणाच्या क्षेत्रांतहि हा अनुभव कमी असण्याचें कारण नाहीं. शेंकडों वर्षें गुलामगिरी अंगांत मुरल्यामुळें तर पावलोपावलीं हा अनुभव येतो. एखादा साधासुधा नवीन वर्ग उघडावयाचा असला किंवा शालेय पुस्तकाचें प्रकाशन करावयाचें असलें तरी देखील उद्घाटनास सरकारी अधिकाऱ्याची आवश्यकता वाटते. ही गोष्ट एकंदर साऱ्या परिस्थितीची फार सूचक आहे.

आर्थिक दृष्ट्या अशा रीतीनें बहुजन समाजाचें दारिद्र्य वाढतें आहे आणि पूर्वीं सांगितल्याप्रमाणें देशांतला फार मोठा निष्ठावान् वर्ग हिंदु या सामान्य

नांवाच्या गोधडीखालीं कनिष्काप्रमाणें गुदमरून जात आहे. अशा स्थितींत कितीहि कमिशनें आणि चर्चा केल्या तरी अखेरीस अरबी भाषेंतील सुरस गोष्टीतल्या मुलीच्या पोटीं ज्याप्रमाणें राजपुत्र न येतां कुत्री, मांजरी येत होती तसाच प्रकार अनुभवाला येईल, अशी भीति वाटणें अवास्तव नाहीं. हल्लीं ज्या अनेक चर्चा होत आहेत, त्या सर्वांचा साधारण सूर शिक्षणाची एकंदर जबाबदारी सरकारनें उचलावी ( म्हणजे आर्थिक दृष्ट्या ) आणि माध्यमिक शिक्षणाचा दर्जा खालावूं देऊं नये असें आहे. माध्यमिक शिक्षणाचा विचार करणाऱ्या मुदलियार कमिशननें पुष्कळच गोष्टींचा बारिकसारीक विचार केला आहे. धार्मिक शिक्षणाची आवश्यकताहि प्रतीपादन केली आहे, आणि उपयुक्त वाटतील अशा सर्व प्रकारच्या सूचना केल्या आहेत. परंतु मूळ प्रश्न कसा सोडवावा या उत्तराच्या अभावीं, इंग्रजीमध्यें ज्याला wishful thinking म्हणतात तसा प्रकार झाला आहे. स्वतःच्या निरीक्षणांत त्यांनीं कांहीं गोष्टींकडे अजिबात दुर्लक्ष केलें आहे त्यांचा विचार पुढें पाहूं. परंतु मूळ प्रश्नाच्या संबंधीं जी अडचण आहे, त्याचा प्रथम विचार करूं. ह्यूजेस शेरमननें म्हटल्याप्रमाणें या सर्व वैचारिक गोंधळाला सर्वसामान्य अशी तात्त्विक बैठक कोणती द्यावी व तिच्यामुळें सरळ होणारा जीवनविषयक दृष्टिकोन कोणता असावा, ही खरी अडचण आहे.

( In the uneasiness of the modern world there is a great yearning for some synthetic view of the whole of life which will give meaning and perspective to all that is happening. — *Modern Theosophy*. *p*. 185 )

कांहीं वर्षांपूर्वीं न्यायमूर्ति वुड्रॉफनेंहि याच अडचणीचा उच्चार केला होता. ( Most serious problem of western knowledge is the recovery of a proper unity and perspective. )

राजसत्तेचा पाठिंबा कितीहि असला तरी देशांतील बहुजन समाजाच्या लहानमोठ्या अनेक श्रद्धांना प्रेषितपणाच्या ऐटीनें तुडवून टाकणाऱ्या विनोबांचा सर्वंकष बुद्धीनेंहि हें काम होणें दुर्घट आहे. परंतु हा महत्त्वाचा मूळ प्रश्न बाजूस ठेवला, तरी प्रत्यक्ष प्रयोगाच्या दृष्टीनें महत्वाच्या कांहीं गोष्टी लक्षांत घेतल्या जात

नाहींत. उदा. अलिकडील शिक्षणांत मानसशास्त्राला ( Psychology ) फार महत्त्व देण्यांत आलें आहे. परंतु आतां विद्वानांच्या असें लक्षांत येत आहे कीं, मनुष्य हा खरोखर काय प्राणी आहे याचा अजून त्या मानसशास्त्रालाच पत्ता नाहीं ( Psychology is not sure of the true nature and constitution of human personality. )

तेव्हां नुसतें मानसशास्त्र हा प्रश्न कसा सोडविणार ? बरें नीट विचार केला तर असें आढळून येईल कीं, मनुष्याला आजपर्यंत खरें शिक्षण म्हणून जें कांहीं मिळत आलें आहे, तें मानसशास्त्राच्या तत्त्वांनाच धरूनच मिळत आलें आहे. मानसशास्त्राच्या तत्त्वांत कांहीं फरक झाला आहे असें नाहीं. तीं तत्त्वें विद्यार्थ्यांच्या पचनीं पडण्यास पूर्वींची अनुकूल परिस्थिति होती ती मात्र आतां राहिली नाहीं. मुदलियार कमिशननें मार्मिकपणानें म्हटल्याप्रमाणें पूर्वी घरोघरच्या वातावरणांत जो सहज शिक्षणाचा परिमळ भरून राहिला असे तो पुनः कसा उत्पन्न करावा हा प्रश्न आहे. त्याचप्रमाणें शालेय शिक्षणाचीहि गोष्ट आहे. एक तर त्या शिक्षणांत शिक्षकाला विद्यार्थ्यांकडे व्यक्तिशः लक्ष देतां येत नाहीं, हा पूर्वींपासूनचाच दोष आहे. आणि आतां तर ती गोष्ट केवळ दुरापास्तच होऊं पहात आहे. जेम्स रॉस म्हणतो त्याप्रमाणें शिक्षण हा वास्तविक दोन जिव्हाळ्याच्या अंतःकरणांचा देवघेवीचा व्यवहार आहे. ( Education in the last resort is not possible without influence ) परंतु दोन अंतःकरणें जवळ आल्याखेरीज हा होणारच कसा ? ज्या ठिकाणीं विद्यार्थ्यांच्या रात्रीसारखे (Students' night) महोत्सव शिष्ट समजले जातात, त्या ठिकाणीं अगदीं जसा पाहिजे तसा शिक्षक असला ( Right type of teacher) तरी तो विद्यार्थ्यांवर पूर्ण प्रभाव पाडूं शकेल हें केवळ अशक्य आहे. जरी त्या शिक्षकाविषयीं विद्यार्थ्यांच्या मनांत व्यक्तिशः पुष्कळ आदर असला तरी त्याच्या ध्येयहीन अंतःकरणांत शिक्षकाचें प्रतिबिंब पडावेंच कसें ? शिक्षणविषयक मूल्यें ठरवितांना प्रथमतः शिक्षणाला कांहीं एक ध्येय असावें असें पुण्याच्या डॉ. बापटांसारखे शिक्षणतज्ज्ञ म्हणूं लागले आहेत. परंतु त्या ध्येयाला घरगुतीवातावरणाची साथ मिळण्याची जी गरज आहे ती कशी भागवावयाची ? मुदलियार कमिशननेंहि हेच खेदोद्गार काढले आहेत कीं, थोडाबहुत शाळेंत जो संस्कार मिळेल त्याला पोषक असें घरीं दारीं कांहींहि मिळणें दुर्मिळ झालें आहे !

## विद्यार्थ्यांचा ऱ्हास व त्याचीं कारणें

या सर्व गोष्टी तर महत्त्वाच्या आहेतच. परंतु त्याशिवाय आणखी कांहीं गोष्टी लक्षांत घेणें जरूर आहे. मधल्या पांच-पन्नास वर्षांच्या काळामध्यें विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक शक्तींचा कमालीचा ऱ्हास झालेला आहे. अलिकडच्या पद्धतींत शालेय अभ्यासक्रमांत आणि त्याच्या बाहेरील जीवनांत विद्यार्थ्यांच्यामागें इतक्या उपाधि लागल्या आहेत कीं, त्यांनीं तो पुष्ट होत आहे कीं त्याचा ताण सहन न झाल्यामुळें उत्तरोत्तर पिचून जात आहे हें फारसें लक्षांत घेतलें जात नाहीं. विद्यार्थ्यांच्या मानसिक ऱ्हासाविषयीं सुमारें तीस वर्षांपूर्वी मॅकडुगलनें आपल्या पुस्तकांत सप्रमाण माहिती दिली होती. निरनिराळ्या देशांतील विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेची चांचणी घेण्याकरितां एक कमिशन चोहींकडे फिरलें होतें. त्यांच्या अनुभवाचें कोष्टकच त्यानें आपल्या पुस्तकांत दिलें आहे. त्यांत शिक्षणकालांत कोणत्याहि विषयाशीं तद्रूप होण्याची अथवा चित्तैकाग्र्याची जी आवश्यकता असते त्याबाबतींत हिंदी विद्यार्थ्यांना अखेरची जागा मिळाली आहे हें लक्षांत ठेवण्याजोगें आहे. आणि तें ठीकच आहे. समर्थ शरीरांतच मनाचें सामर्थ्य असतें. ( Sound mind in a sound body ) असें सर्वत्र म्हटलें जातें मात्र परंतु येथील शिक्षणाधिकारी दुबळ्या शरीरांतून समर्थ मनाची अपेक्षा करीत आहेत. तें व्हावें कसें ? या शारीरिक ऱ्हासाचा शिक्षणाशीं किती संबंध आहे हें लक्षांत घेऊन व्हावा तसा विचार केला जात नाहीं. शाळांतून विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय परीक्षांचें ठराविक सोंग असतेंच; परंतु वरवरच्या ठराविक पहाणीपलीकडे खोलांत जाऊन विचार करण्याचें त्यांच्या गांवींहि नसतें. पौष्टिक खुराक मिळत नाहीं हें एक ठराविक कारण ठरलेलेंच असतें. त्याच्या जोडीला फार झालें तर कोणत्या तरी नांवाखालीं कॅल्शियम आणि व्हिटॅमिनचें कांहीं कल्प घेण्यास त्याला सांगितलें म्हणजे झालें. त्या विद्यार्थ्यांच्या खासगी जीवनाची चौकशी करण्यास अथवा वरील ठराविक कारणापलीकडे मुष्टिमैथुनासारख्या कांहीं उपाधि त्याला आहेत कीं काय आणि तसें असल्यास कुक्कुटांडासारखीं उत्तेजक द्रव्यें उलट त्याला व्यसनांतच जास्त लोटतील कीं काय हा विचार करण्यास सवडहि नाहीं आणि कारणहि नाहीं ! उत्तरोत्तर दुर्बल होत गेलेली पिंडपरंपरा, दारिद्र्य, शहरी जीवन आणि नानाप्रकारचीं व्यसनें यांमुळें त्याच्या धारणाशक्तीचा सर्वतोपरी ऱ्हास झालेला असतो

आणि त्यांत त्याच्यावर हल्लींच्या शिक्षणपद्धतीप्रमाणें इतक्या विषयांचा मारा होतो कीं, आयुष्यांत कांहीं काळ आलेली ती एक पुरासारखी अवस्था होऊन पूर ओसरल्यावर मागून जसा गाळ शिल्लक रहातो तसा अनेक प्रकारच्या संस्कारांचा रेंदा त्याच्याजवळ शिल्लक राहतो.

## सुशिक्षित (?) भारतीय स्त्री

जी गोष्ट पुरुष-विद्यार्थ्यांची तीच गोष्ट स्त्री-विद्यार्थ्यांची. कुटुंब-संस्थेचा कितीहि ऱ्हास झाला असला तरी घर म्हणून कांहीं वस्तु आहेच. व तिच्याशीं पुरुषापेक्षां स्त्रीचा संबंध बाळपणापासूनच जास्त निकटचा येत असल्यामुळें, दोघांच्या घडणीमध्येंच स्वभावतः फरक असतो म्हणून काय फरक पडत असेल तो असो. एरव्हीं स्त्री-शिक्षणाच्या बाबतींतहि कांहीं समाधानकारक परिस्थिति नाहीं. वर सांगितलेल्या मूलभूत फरकापलीकडे शिक्षणाच्या चक्रांतून बाहेर पडलेल्या स्त्री-पुरुषांत कोणताच भेद आढळून येत नाहीं. उलट असें झालें आहे कीं, स्त्री-शिक्षणाची लाट पुरुषांच्या शिक्षणाच्या मागाहून जोरांत आलेली असल्यामुळें विचारवान् पुरुषांना अनुभवानें आज जें शहाणपण येऊं पहात आहे तें अजून त्यांना यावयाचें आहे. थोडक्यांत म्हणावयाचें म्हणजे एकोणिसाव्या शतकांत आणि चालू शतकाच्या प्रारंभीं व्हिक्टोरिया युगांतील आज निरनिराळ्या प्रकारांनीं असिद्ध ठरलेल्या पांडित्याचा व विचारसरणींचा जो पगडा होता तो आज पुरुषवर्गांत पुष्कळ प्रमाणानें ओसरलेला आढळून येत आहे. परंतु सुशिक्षित म्हणविणारा लहान-थोर स्त्री-वर्ग घेतला तर त्यांत अजून तेच प्रवाह जोरानें खळखळत आहेत असें दिसून येतें. सुशिक्षित म्हणविणाऱ्या ज्या कांहीं समाजधुरीण, शिक्षणासारखें कार्य करणाऱ्या लेखिका अथवा वक्त्या, आज जे कांहीं विचार प्रकट करीत आहेत त्यांवरून ही गोष्ट स्पष्ट होते कीं, इंग्रजानें इथें मुद्दाम उत्पन्न केलेला जो वर्ग वर म्हटला, त्यांतच त्या मोडतात. आणि अजूनहि त्यांचें बहुतेक सर्व कार्य, तोंडानें अभिमानाची केवढीहि भाषा असली तरी परंपरेच्या अवहेलनांतच आहे. एवढेंच कीं, न्यायमूर्ति वुड्रॉफच्या म्हणण्याप्रमाणें व्हिक्टोरिया-युगांतील विचारांची प्रत्यक्ष प्रजा ती नाहीं. मानसपुत्रांच्या त्या पुत्री आहेत ! त्यांच्या योगानें शिक्षणाचे मूलभूत प्रश्न सोडविण्यास फारशी मदत कशी होणार ? या मूलभूत प्रश्नाचें स्वरूप मुदलियार-कमिशननें थोडक्यांत असें मांडलें आहे कीं, संस्कृतीच्या अंतर्भूत जीं अनेक प्रकारचीं

जीवनमूल्यें असतात त्यांचें संक्रमण अंतःकरणांत घडविणें हें खरें शिक्षणकार्य आहे. ( It will have a lively appreciation of the basic truth that " the education of a mind is essentially a process of revivifying of the latent values contained in the goods of culture. ", p. 221 ) आडांतच नाहीं तर पोहऱ्यांत येणार कुठून ? आणि असा राष्ट्रघटक राष्ट्राच्या बांधणीला कितीसा उपयोगी पडणार ? कारण लोकशाहींतील घटक असा असला पाहिजे कीं, विषयाचें स्वरूप समजण्याइतकी बुद्धीची प्रौढता, सत्यान्वेषणाविषयीं आग्रह, प्रचार, अभिनिवेश आणि दुर्ग्रह यांना बाजूला सारण्याइतकी धमक त्याच्या अंगीं असली पाहिजे. ( To be effective a democratic citizen should have the understanding and the integrity to sift truth from falsehood, facts from propaganda and to reject the dangerous appeal of fanaticism and prejudice.—M. C., p. 24 ) अशी धमक किती स्त्रीलेखकांच्या ठिकाणीं अथवा वक्त्यांच्या ठिकाणीं आढळून येते हें ज्याचें त्यानें आपल्या अनुभवाप्रमाणें पहावें. सिनेमा, रेडियो, मासिकें इ. सर्व प्रचार-साधनें बहुतांशीं याच वर्गाच्या हातांत असल्यामुळें त्यांच्या द्वारें दिसून येणारें या वर्गाचें अंतःकरण पाहिलें तर असें दिसून येतें कीं, सुशिक्षितपणाचा डौल, केवळ साक्षर नाहींत म्हणून इतर स्त्रियांना अशिक्षित समजण्याइतका अभिमान, स्वतंत्र प्रज्ञेचा अभाव, पूर्वपरंपरांविषयीं तत्त्वतः अज्ञान आणि अनादर आणि मधल्या काळांत व्यवहारांत आलेल्या कांहीं रूढी, सनातनत्व, बुरसटलेपणा इ. वाङ्मयनाण्यांची समृद्धि हेंच त्यांत आढळून येतात. नाहीं म्हणावयास अजून आमच्या स्त्रिया पूर्णपणें पुरुषी बनल्या नसल्यामुळें त्यांचें स्त्री-अंतःकरण त्यांच्याजवळ थोडें उरलें आहे. त्यामुळें त्यांच्या लेखनांत मायाळूपणा, सहानुभूति, करुणा इ. चा ओलावा पुरुष-लेखकांपेक्षां जास्त असतो इतकेंच.

## धड ना स्त्री ना पुरुष

या अशा कारखान्यांतून निघालेली स्त्री शिक्षणाच्या क्षेत्रांत येते, परन्तु तेथें तिला तिच्या यथार्थ वाढीला उपयोगी असें फारसें कधींच मिळत नाहीं. कारण शिक्षणक्षेत्रांत आतां नवीन असा पेंच उत्पन्न झाला आहे. तो कसा सुटणार हा मोठाच प्रश्न आहे. स्त्री आणि पुरुष यांच्यांत निसर्गानें जो

फरक केला आहे तो " देहींच मात्र संतति कार्याला " असें मात्र आतां कोणीच म्हणत नाहीं अलेक्सिस कॅरेलसारखे शास्त्रज्ञ तर हा भेद अथपासून इतीपर्यंत आहे आणि म्हणून प्रथमपासूनच त्यांची वाढ वेगळ्या वेगळ्या रीतीनें झाली पाहिजे असें म्हणत आहेत. परंतु आज तर अशी परिस्थिति उत्पन्न झाली आहे कीं, जीवनकलहांत स्त्री ही पुरुषाची प्रतिस्पर्धी होऊन बसली आहे. स्वतःच्या व कुटुंबाच्या निर्वाहाकरितां तिला पुरुषाच्या कार्यक्षेत्रांत त्यांच्या बरोबरीनें उतरावें लागतें. तेव्हां तिचें शिक्षण पुरुषाहून वेगळ्या घाटाचें असून कसें चालेल ? त्यामुळें दोघांच्या शिक्षणांत आमूलाग्रच फरक असले पाहिजेत असें कितीहि म्हटलें तरी ते कसे करावेत याचा उलगडा झाला नाहीं तोपर्यंत " हर हर न हिन्दुर्न यवनः " अशी स्थिति राहणें प्राप्तच आहे. मग स्त्री-पुरुषांत स्पर्धाच नको असें कु. कर्नाटकी कितीहि म्हणोत. ( स्त्री, जून १९५६ )

## कु. कर्नाटकी काय म्हणतात ?

कु. चन्द्रा कर्नाटकी यांचा वरील लेख मननीय आहे. विशेषतः स्त्रियांच्या-मागचें अनेक विषयांचें लोढणें काढून टाकलें पाहिजे, निदान तपशिलावरचा भर कमी करून त्यांचें जुजबी ज्ञान दिलें पाहिजे, ही त्यांची सूचना फार विचारार्ह आहे. पुरुष विद्यार्थ्यांप्रमाणेंच शालेय जीवनांतील अनेक व्यवसायांचा परिणाम स्त्री-विद्यार्थ्यांवर होतो त्यामुळें घरांतून त्यांचें लक्ष उडतें हें त्यांचें म्हणणें फार मार्मिक आहे. या अनेक व्यवसायांचा ताण सहन न झाल्यामुळें साहजिकच त्यांच्या शरीरावर त्यांचा अनिष्ट परिणाम होतो. त्यांनाहि माध्यमिक शिक्षण उच्च शिक्षणाची पायरी म्हणूनच घ्यावी लागतें आणि जोंपर्यंत कु. कर्नाटकी यांनीं म्हटल्याप्रमाणें कॉलेज-शिक्षणानें फायदा होतो ही समजूत चूक आहे, उलट त्यानें तोटेच होतात हें लक्षांत येत नाहीं, तोंपर्यंत हें असेंच चालावयाचें. कांहीं वर्षांपूर्वी श्रीमती शांताबाई नाशिककर यांनीं स्त्रीशिक्षणाविषयीं आपला अनुभव सांगतांना असें म्हटलें होतें कीं, त्याचे शरीरावर फार दुष्परिणाम होतात. साधारण दहाव्या इयत्तेंत मुलगी गेली म्हणजे तिचें वजन कमी होऊं लागतें. आजहि कांहीं वेगळा अनुभव येईल असें नाहीं. त्याच सुमारास मुलींचे केस जाऊं लागण्याची फार मोठ्या प्रमाणावर तक्रार आढळते. डोळे अधू होणें, दांत खराब असणें यांना तर आतां कांहीं विशेष महत्त्व राहिलेंच नाहीं.

साधारणतः तेरा वर्षांच्यावर असलेल्या शेंकडा पंच्यायशी मुली धुपणीसारख्या निःसत्त्व करणाऱ्या रोगानें पीडलेल्या आढळतात. या सर्वांचा परिणाम अर्थातच त्यांच्या शिक्षणावर होतो.

सुदैवाची गोष्ट अशी आहे कीं, सुशिक्षित स्त्री ही एक समस्या होऊं पहात आहे आणि तिची स्थिति समाधानकारक नाहीं याची जाणीव आतां सुशिक्षित म्हणविणाऱ्या स्त्री वर्गास होऊं लागली आहे. प्रौढ कुमारिकांचे प्रश्न, सुशिक्षित स्त्रीचें अर्थोत्पादन, तिचें जीवन सुखी आहे किंवा नाहीं इ. अनेक प्रश्नांवर आज जें विचारमंथन सुरू झालेलें दिसत आहे तें याचें पुरेसें गमक आहे. अर्थात् या मंथनांतून कांहीं हलाहल बाहेर आलें नाहीं तरी उपयोगी असें एखादें रत्न कधींच बाहेर पडत नाहीं. आणि त्याचें कारण हेंच आहे कीं, या विषयावरील लेखी अथवा तोंडी वादविवाद एक तर अभिनिवेशाचे असतात अथवा मूलभूत प्रश्नांचे तर्कशुद्ध असे निकष घेऊन केलेले नसतात. वैयक्तिक अनुभवावरून तर यांचा निकाल कधींच लागत नसतो. सर्व जगापुढें प्रकट केलेला वैयक्तिक अनुभव हा मारुतीच्या बेंबींतील गारवाच असण्याचा जास्त संभव. तरी पण अशी जाणीव त्या वर्गातील कांहीं व्यक्तींना तरी होऊं लागली आहे यावरूनच कोठें तरी पाणी मुरतें आहे हें उघड आहे. या लेखांत या विषयांत जास्त शिरतां येणार नाहीं हें उघड आहे. नुकतेच येथें या संबंधानें जे परिसंवाद झाले त्यांत श्रीमती रमाबाई तांबे यांनीं सुशिक्षित स्त्रियांचें जीवन देखील समाधानकारक आहे असें म्हणत म्हणतच जुन्या बायांच्या समाधानवृत्तीचें अनुकरण सुशिक्षित स्त्रियांनीं करणें हितावह होईल अशा अर्थाची जी सूचना दिली आहे ती या दृष्टीनें फार चिन्त्य आहे.

## सुशिक्षित (?) म्हणजे सुशील नव्हे

शिक्षणाच्या क्षेत्रांतील गोंधळाचें वर जें चित्र मांडलें आहे तें अर्थातच महाराष्ट्रास धरून जास्त आहे. तरी पण त्यामुळें गैरसमज होण्याचें कारण नाहीं. ब्राह्मण–ब्राह्मणेतर वादासारखे कांहीं प्रश्न महाराष्ट्र–मद्रासकडे जास्त तीव्र स्वरूपाचे असतील परंतु सामान्यतः तें वर्णन सर्व हिंदुस्थानला लागू आहे. हें सारें स्वरूप लक्षांत घेतलें म्हणजे या शिक्षण-समस्येचा उलगडा होण्याकरितां कोणत्या दृष्टीनें प्रयत्न केला पाहिजे हेंहि लक्षांत येईल. त्या मूलभूत गोष्टींचा विचार केल्याखेरीज शिक्षणावर कितीहि पैसा खर्च केला अथवा त्याचें दर्शनी

स्वरूप कितीहि भपकेदार असलें तरी त्याचा कांहींहि उपयोग होणार नाहीं हें उघड आहे. नुसती माणसाची रहाणी कितीहि भपकेदार व वैभवसंपन्न ठेवली म्हणजे आंतला मनुष्य जास्त वरच्या दर्जाला पोहोंचला असें होत नाहीं. ( The deepest of all fallacies, is the assertion that Personalities can be improved merely by raising the standard of living.—Rediscovery of Man, p. 147 ) तशीच हीहि गोष्ट आहे. राष्ट्राच्या उत्कर्षाकरितां मूलभूत प्रश्न विचारांत न घेतां नुसत्या शिक्षणाचे कितीहि डोझ पाजले तर त्याचा उपयोग तर होत नाहींच पण वेळेस अनिष्ट परिणाम होण्याचाहि संभव आहे. ( Dozens of psychological studies have already shown that there is little or no relationship at all between personality and years of education. The well educated are as likely to be socially maladjusted as are the less educated. *Ibid*, p.161 ) या मूलभूत प्रश्नासंबंधीं कांहीं सूचना करण्यापूर्वी प्रत्यक्ष प्रयोगाच्या दृष्टीनें जी अडचण आहे तिचा थोडा विचार करणें अवश्य आहे.

प्रत्यक्ष प्रयोगाच्या दृष्टीनें खरी अडचण काय आहे याचा थोडा निर्देश वर केला आहे. मुदलियार-कमिशननें वर म्हटल्याप्रमाणें शालेय वातावरणांत मुलगा फार थोडा राहतो आणि तेथें त्याला जें कांहीं मिळतें तें थोडेंबहुतहि वाढीला लागेल अशी घरीं दारीं परिस्थिति नसते. व्यक्ति तयार होण्याच्या दृष्टीनें जेथें शिक्षकाचीच पात्रता कमी झालेली आहे तेथें तो विद्यार्थ्याला काय देणार ? ( The situation has been further aggrevated by the fact that the average efficiency of the teachers has deteriorated.—M. C., p. 22 ) दुसऱ्या शब्दांत हेंच म्हणावयाचें म्हणजे कुटुंबसंस्था नष्ट होण्याच्या मार्गास लागल्यामुळें घरेंहि नुसतीं घरेंच होऊन त्यांना जवळजवळ हॉटेलचें स्वरूप प्राप्त झालें आहे. आणि शिक्षणाकरितां तर ही गोष्ट अवश्य आहे कीं, कोवळ्या वयांत मुलांना कसेंहि करून यथार्थतेनें कुटुंब तयार करून दिलें पाहिजे. कोणत्याहि स्वरूपाचें का होईना कुटुंबसंस्थेंत असलेल्या जीवाचें बाहेरील अनिष्ट गोष्टींपासून सहजच संरक्षण होत असतें. तसें कांहीं साह्य नसलें तर नुसतें चार-पांच तास शाळेंतील वातावरणांत नदीच्या लाटांत हलणाऱ्या लव्हाळ्याप्रमाणें डुलत राहून कितीसा फायदा होणार ? बाहेरील

संस्कार प्रबळ होऊन शालेय शिक्षणाच्या काळांतील संस्कारांचा सहज नाश करतील हें उघड आहे. ( After all, they spend only one fourth or one fifth part of the day in school and the rest of their time is passed in direct or in indirect contact with these other agencies, which can easily undo the good work of the school, for, it is essentially the whole of the Commumunity and not merely the school that educates.—M. C., p. 120 )

## भूमीच शुद्ध केली पाहिजे

एवढयावरून एक गोष्ट सहज लक्षांत येते कीं, शिक्षणाचे मुख्य उद्देश्य जें चारित्र्यसंपन्न असे सर्व प्रकारें श्रेष्ठ दर्जाचे नागरिक उत्पन्न करणें तें जर खरोखरच साधावयाचे असतील तर ज्या समाजरूपी भूमींत हीं शिक्षण-संस्थांचीं रोपटीं वाढावयाचीं ती भूमीच शुद्ध केली पाहिजे. आणि या भूमीची काय अवस्था आहे हें प्रारंभींच्या विस्तृत वर्णनावरून पूर्णपणें लक्षांत येईल. लोकशाहीच्या मनोरचनेचें मोठें रहस्य मुदलियार-कमिशननें असें सांगितलें आहे कीं, तिच्या घटकाच्या ठिकाणीं अन्य मताविषयीं नुसती सहिष्णुता असून देखील चालत नाहीं, प्रामाणिक श्रद्धांचा आदर करण्याची तत्परता असली पाहिजे. अर्थात् खरीखुरी, चवाठ्यावरील भाषणांत ती केव्हांहि असतेच. ( The essence of a democratic society is not only the tolerating but the well-coming of the differences which make for the enrichment of life. M. C., p. 25 ) इतकेंच नाहीं तर कोणत्याहि रीतीनें मतांचा व श्रद्धांचा सबगोलंकार करण्यानें कांहीं साधलें असें जरी वाटलें तरी अखेरीला त्यांत हानीच आहे. जर आमच्या लोकशाहीला चिरंजीव व्हायचें असलें तर नाना तऱ्हेची भिन्नता आदरानें स्वीकारण्याची प्रवृत्ति उत्पन्न केली पाहिजे. ( Dragooning different beliefs, ideas, opinions, tastes and interests into uniformity may possibly make for efficiency in an narrow and inferior sense but it inevitably impoverishes life and curbs the free expression of the human spirit. If democracy of ours is to survive..........education must cultivate in our youth an openness of mind and a largeness of heart.—M.C., p. 25-26 )

## मुदलियार-कमिशनची साक्ष

परंतु हल्लींच्या वैचारिक गोंधळांत हें व्हावें कसें ? प्रत्यक्षांत आज सर्व प्रकार याच्या उलट घडत आहेत हें वेगळें सिद्ध करण्याचीहि गरज नाहीं. साध्या पंतोजी-पासून तों पंतप्रधानापर्यंत हल्लींच्या तरुणांविषयीं जे उद्गार वारंवार काढले जातात त्यावरूनच ही गोष्ट सिद्ध होते. उत्तम जमीन, पाहिजे तशी हवा, खत, पाण्याचा पुरवठा आणि योग्य तशी जोपासना हें सर्व असल्यावर फळ चांगलें येणार नाहीं हें शक्यच नाहीं. फळेंच किडकीं आहेत म्हणजेच भूमि, खत-पाणी इ. सदोष आहेत, इतकेंच नव्हे तर बीजच किडकीं आहेत हें उघड आहे. याचें कारण प्रथम सांगितल्याप्रमाणें लोकशाहीचा सर्वच घांस एकदम गिळून टाक-ण्याची हाव. लोकशाहीला लोकशिक्षणाची किती आवश्यकता आहे हें कांहीं नवें सांगण्याची गरज नाहीं. खऱ्या अर्थानें शेंकडा दहा टक्केहि तें आज भारतांत नाहीं हें उघड आहे. अशा अवस्थेंतील लोकशाही कशी असते आणि खऱ्या लोकशिक्षणास तिचा अडथळा कसा होतो हेंहि मुदलियार-कमिशननें फार सुंदर सांगितलें आहे. ( A democracy of a people who can think only confusedly can neither make progress, nor even maintain itself, because it will always be open to the risk of being misled and exploited who have within their reach today unpresidently powerful media of mass communication and propaganda.—M. C., p. 24 ) विचारशक्ति परिपक्व न झालेल्या लोकांच्या हातांत लोकशाही पडण्यांत मोठा धोका असा आहे कीं, वैचारिक गोंधळामुळें लोकांच्या चित्तांत कोणत्याच बाबतींत स्थैर्य नसतें. मोठे हंबीरराव म्हणून मिर-विणारे गांवगुंड कळसूत्री बाहुल्यांप्रमाणें लोकांना सहज खेळवूं शकतात. आणि आज योग असा आहे कीं, पूर्वी कधींहि नव्हती अशा तऱ्हेचीं प्रचारसाधनें या लोकांना सहजच उपलब्ध असतात.

तात्पर्य काय कीं, भारतीय राज्यास यथार्थ लोकशाहीचें स्वरूप येण्यास जें शिक्षण देणें अवश्य आहे त्याची प्रथम तयारी शिक्षणक्षेत्राच्या बाहेरच करावयास हवी. शिळी भाकरी खाऊन पोट दुखतें म्हणणाऱ्या रोग्यास वैद्यानें पोटावर उपचार न करितां डोळ्यावर उपचार करावयास सांगितलें अशी आख्यायिका आहे तशीच ही गोष्ट आहे. भाकरीचा शिळेपणा ज्या डोळ्यांना

दीसला नाहीं ते डोळे प्रथम दुरुस्त केले पाहिजेत. त्याप्रमाणेंच जेथून तरुणांवरतीं खरे संस्कार होतात अथवा जेथून मिळालेल्या संस्कारांनीं शाळा व घर यांत दिले गेलेले संस्कार उध्वस्त होतात तें घर व शाळा यांच्या बाहेरील वातावरण प्रथमतः निवळलें पाहिजे तरच शिक्षणाचा खरा परिणाम होईल. त्या व्यतिरिक्त मुदलियार-कमिशननें सुचविलेल्या योजना कितीहि उत्कृष्ट असल्या तरी त्यांचा कांहीं उपयोग होणार नाहीं, हें त्या कमिशनचाच रिपोर्ट बारकाईनें वाचणाऱ्यांच्या लक्षांत येईल. परंतु बाहेरचें वातावरण निवळावयाचें म्हणजे काय ?

## बाहेरचें वातावरण

वस्तुतः हा एक स्वतंत्र विषय आहे आणि त्यावर विस्तृत विवेचन करण्याची आवश्यकता आहे. परंतु या लेखांत थोडेसें दिग्दर्शन करण्यापलीकडे जास्त कांहीं करतां येणें शक्य नाहीं. आमच्या लोकांनीं इंग्रजांपासून राज्यदान घेतलें आहे त्यामुळें इंग्रजी राज्याचे हरेक तऱ्हेचे दुष्परिणाम येथें दिसत आहेत. हे दुष्परिणाम नाहींसे करून भारताला खऱ्या लोकशाहीचें स्वरूप द्यावयाचें म्हटलें तरी इंग्रजांच्याच कांहीं उपायांचा अवलंब करावा लागेल. पूर्वी सांगितलेंच आहे कीं, शासनापासून तों इतर सर्व क्षेत्रें अशाच लोकांच्या हातीं पडलीं आहेत कीं, ज्यांची स्वतंत्र बुद्धिहि पाश्चात्य विचारांच्या कक्षेंतच भरारी मारूं शकते अथवा न्यायमूर्ति वुड्रॉफनें म्हटल्याप्रमाणें पाश्चात्यांच्याच तालावर नाचते. ( ...Share in the rise and fall of their European masters. ) ही परिस्थिति किती अनिष्ट आहे आणि तिच्यामुळेंच हल्लींचा वैचारिक गोंधळ कसा उत्पन्न झाला आहे याविषयींच्या वादांत न शिरतां एक गोष्ट निश्चित म्हणतां येते कीं, जीवनाकडे पहाण्याचा राष्ट्राचा असा कोणताच दृष्टिकोन न राहिल्यामुळें राष्ट्रीय ध्येयाच्या गोष्टी कितीहि बोलले तरी वैयक्तिक जीवन ध्येयहीन बनत चाललें आहे. खावें, प्यावें, साधेल तशा रीतीनें मिळेल तेवढें इंद्रियसुख मिळवावें, आजचा दिवस निभला म्हणजे झालें, उद्यांची फिकीर उद्यांला अशी वृत्ति वाढत चाललेली आहे हें सर्वांच्या प्रत्ययाला येत आहे. परंतु सखोलपणानें त्याचा विचार मात्र केला जात नाहीं.

## भाई डांगे व असेच बोलके म्हातारे !

तरुणांचीं मनें दुबळीं होत आहेत ही गोष्ट भाई डांग्यांना आणि सर्वांनाच बोचते. परंतु त्याची मीमांसा करतांना आपआपल्या प्रचारपद्धतीला अनुसरून

दैववादासारखें कांहीं तरी कारण त्याला दिलें म्हणजे प्रश्न सुटला असें जोंपर्यंत वाटत आहे तोंपर्यंत त्याचा खरा उपायहि सांपडणें शक्य नाहीं. तसें पाहिलें तर भारतांत दैववाद नव्हता कधीं ? दैववाद हा मनुष्याच्या विचारसरणीचा एक स्वयंभू पैलूच आहे. पृथ्वीच्या पाठीवर कोणत्याहि देशांत कोणत्याहि समाजांत तो सर्वकाळ आढळत आला आहे. भारतवर्षांत त्याला शास्त्रीय स्वरूप असल्यामुळें तर त्याचें अजिबात निर्मूलन होणें शक्य नाहीं. परंतु प्रश्न असा आहे कीं, मनुष्याच्या नैसर्गिक प्रवृत्तीहि तितक्याच स्वयंभू आणि प्रबळ आहेत. मनुष्य दैववादी बनल्यानें या नैसर्गिक प्रवृत्ती कुंठित होतात का निसर्गरीत्याच या नैसर्गिक प्रवृत्ती आधीं दुबळ्या होतात आणि मग दैववादानें मनुष्याच्या दुबळेपणाचें समाधान होतें ? मुसलमानांच्या पूर्वींचा भारतवर्षाचा उज्ज्वल इतिहास सोडून दिला आणि अलिकडच्या काळींच पाहिलें तरी ही अशी इतिहासाची साक्ष नाहीं कीं, केवळ दैववादामुळें भारतीय मनुष्य प्रज्ञाहत झाला आहे अथवा प्रयत्नपराङ्मुख बनला आहे. इंग्रजी राजवटींत अधोगतीची पराकाष्ठा झाल्यामुळें वस्तुतः राष्ट्र रोमन वगैरे जुन्या राष्ट्रांप्रमाणें नामशेषच व्हावयाचें. तरी देखील राष्ट्र आज मान ताठ करून उभें आहे तें काय राष्ट्रांतील तरुण दैववादी बनले होते म्हणून ? क्रांतीच्या लाटेंत शिरून शेंकडों तरुणांनीं हंसत हंसत गळ्याला फांस लावून घेतले, तुरुंगवास सोसले, गांधीजींच्या पाश्चात्यपद्धतीच्या चळवळी केल्या त्या काय दैववादी मनोदुर्बलतेनें केल्या ?

याचा अर्थ असा नाहीं कीं, तरुणांचीं मनें उत्तरोत्तर दुर्बल बनत आहेत. हें खरें नाहीं. तें तर अत्यंत कटु सत्य आहे. परंतु पूर्वी सांगितल्याप्रमाणें राष्ट्रांतील अनेक प्रकारचा वैचारिक गोंधळ आणि त्यामुळें उत्पन्न होणारी " किमन्यत्कामहेतुकम् " अशी प्रवृत्ति, बेछूट रहाणी, अनेक प्रकारचीं व्यसनें इत्यादि महत्त्वाच्या कारणांनीं मनें आधीं दुर्बळ बनतात, आणि म्हणून दैववादाच्या काडीचा आश्रय करितात. हीं सर्व कारणें जर प्रयत्नपूर्वक दूर करतां आलीं तर दैववादाचें तात्त्विक अस्तित्व असूनहि व्यक्तीच्या जोमदारपणांत कांहीं कमीपणा येत नाहीं असा जगाचा सर्वकालीन अनुभव आहे.

### सरकारचें कर्तव्य

थोडें विस्तार करून हें लिहावें लागलें याचें कारण एवढेंच आहे कीं,

प्रचारैक दृष्टीनें भारतीय प्रश्नांचा जोंपर्यंत विचार केला जातो तोंपर्यंत अशा तऱ्हेच्या अडचणींतून खरा मार्ग निघणें शक्य नाहीं. लोकशाहींत लेखन-स्वातंत्र्य आणि भाषण-स्वातंत्र्य यांच्या मर्यादा किती असूं शकतील या वादांत न शिरतांहि असें म्हणतां येईल कीं, असल्या तऱ्हेच्या अपप्रचाराचें सत्य स्वरूप दाखविणारें वाङ्मय अवश्य उत्पन्न केलें पाहिजे. मधल्या काळांत राष्ट्रानें ज्या कित्येक असंभावना बाळगल्या त्यांचें निर्मूलन होईल असें वाङ्मय उत्पन्न करण्याकडे सरकारीरीत्या लक्ष पुरविलें पाहिजे. उदाहरणार्थ :—मधल्या काळांत जरी कोणत्याहि कारणानें असो, हिंदु समाजांतील जातिसंस्थेचा प्रचारार्थ उपयोग केल्याकारणानें तिच्यासंबंधीं खरे-खोटे अनेक अपसिद्धान्त प्रसृत करण्यांत आले व त्याकरितां ऐक्याची सरूपता ही मूर्ख कल्पना आणि एका ताटांत बसून खाणें-पिणें म्हणजेच राष्ट्रीय ऐक्य इ. गोष्टींवर भर देण्यांत आला होता, तरी त्यानें हित न होतां अनहितच जास्त होत आहे. हें सरळपणें लक्षांत घेऊन, जातिभेदानें राष्ट्रैक्य मोडत नाहीं, जातिद्वेषानें मोडतें असें शिकविण्याची वेळ आतां आली आहे. श्रीमन्नारायणासारखे कॉंग्रेसचे सेक्रेटरीच आतां अशा प्रकारच्या सूचना करूं लागले आहेत हें फारच सूचक आहे. जातिभेद इष्ट आहे किंवा अनिष्ट आहे हा प्रश्न कसाहि असो, निर-निराळ्या अपप्रचारांनीं तो मोडून टाकण्याची घिसाडघाई जी होत आहे ती मात्र निर्विवाद अनिष्ट आहे.

## विद्वत्तेचा भ्रम

प्रचार म्हटला कीं, तो बहुतकरून कोणत्या ना कोणत्या तरी रीतीनें विद्वान् समजल्या गेलेल्या माणसाच्या नांवावर असतो. त्यासंबंधीं हल्लीं अशी एक विचारसरणी झाली आहे कीं, साधी गोष्ट असो प्रयोगाची असो, अनुभवाची असो अथवा विज्ञानाची असो, एका बाबतींत माणसाला थोडें चटकदार लिहितां आलें म्हणजे तो साऱ्याच बाबतींत अधिकारी समजला जातो. अल्डस-हक्स्लेनें म्हटल्याप्रमाणें एका बाबतींत विद्वच्छ्रेष्ठ असलेला मनुष्यहि दुसऱ्या बाबतींत केवळ मूर्ख असतो! हेंहि लक्षांत येत नाहीं. (...Such men are highly intelligent in certain directions but profoundly stupi in others.—Ends and Means.) हल्लींच्या—सारख्या प्रचारांत खरेखोटे-पणाची किती मिसळ असते हेंहि उघड करून, अशा प्रचारांना आळा

घालण्याचें काम तरुणांच्या कळवळ्यानें सरकारीरीत्या व्हावयास पाहिजे. ( At no period of the world's history has organized lie being praclised so shamelessly, thanks to modern technology. So efficiently or on so vast a scale as by the potitical and economic dictators of the present century.-Ends and Means.)

## अधिकार पाहिला पाहिजे

याचा अर्थ अर्थातच असा नाहीं कीं, सर्वच प्रचार दुष्ट हेतूनें चाललेला असतो. परंतु अशा गोष्टींत नुसता हेतु चांगला असून चालत नाहीं. अधिकार म्हणून कांहीं एक वस्तु आहे हें लक्षांत ठेवावें लागतें. परन्तु त्यांतहि एक गोम अशी आहे कीं, एखाद्या विषयांत मनुष्य केवढाहि मोठा पदवीधर असला अथवा यथार्थतेनें अधिकारी असला म्हणजे तो शिक्षणासारख्या क्षेत्रांत मत देण्यास अधिकारी असतोच असें नाहीं, कारण आपण वर पाहिलेंच आहे कीं, शिक्षणाचा प्रश्न आतां नुसतें ज्ञान देणें अथवा एखादी कृति करावयाला शिकविणें एवढ्याचपुरता राहिला नसून सर्व समाजाशीं एकरूप असा विराट् स्वरूपाचा झाला आहे. आणि त्यामुळें प्रत्यक्ष शिक्षणक्षेत्रांत, ज्ञान आणि अनुभव या दोन्हींहि दृष्टीनें मोठा असूनहि हे प्रश्न तो सोडवूं शकेलच असें नाहीं. वर सांगितलेंच आहे कीं, एखाद्या विषयांत बृहस्पती झाला आणि प्रभावीपणानें लिहूं किंवा बोलूं लागला म्हणजे हव्या त्या विषयावर बोलण्यास तो अधिकारी आहे आणि म्हणून त्याच्या विचाराला प्रामाण्य आहे ही हल्लींची समजूत अजीबात चूक आहे. एखाद्या प्रांतांत विद्वान् असूनहि तो अन्य क्षेत्रांत त्याचीं मूळाक्षरेंहि न समजण्याइतका अविद्वान् असतो. ही गोष्ट डनबारनें आपल्या पुस्तकांत चांगली दाखविली आहे. ( We have relinquished as an ideal the mastery of the whole realm of human knowledge by one person, but our training has tended to keep each of us so closely limited by his own field that he has remained ignorant even of the fundamental principles in the fields outside his own—p. 3,—Emotions and Bodily Changes by H. Dunbar) हें डनबारचें म्हणणें किती यथार्थ आहे. हें समजण्यास लांब देखील जावयास नको. डॉक्टरेटच्या पदवीकरितां विषय निवडणाऱ्या विद्यार्थ्यांचें नुसतें त्या विषयाचें स्वरूप ठरविण्याच्या बाबतींत देखील मोठमोठ्या पदवी

धारण करणाऱ्या प्राध्यापक मंडळाकडून कसे हाल होतात आणि त्यांना वर्षानुवर्ष कसें लोंबकळत पडावें लागतें तें पाहिलें म्हणजे पुरे आहे. सहजच निरीक्षकास असें वाटूं लागतें कीं, नियमांच्या पांघरुणाखालीं स्वतःचा एकांगीपणा झांकण्याचा हा प्रयत्न तर नाहीं ?

## नागपूर युनिव्हर्सिटीचें उदाहरण

अशा प्रकारची बाह्यस्थिति कशी निवळावी हें सांगण्याची कुणाहि एका माणसानें ऐट करणें व्यर्थ आहे. मुदलियार-कमिशनलाच अनुसरून येथें थोडक्यांत असें सुचवितां येईल कीं, बाहेरील होणाऱ्या लेखी, तोंडी अथवा इतर कोणत्याहि प्रकारच्या प्रचाराचें स्वरूप नुसतें सहिष्णु असून भागत नाहीं तर प्रामाणिक मतभेद असूनहि परस्परांविषयींचा परस्परांचा आदर कमी होणार नाहीं असें त्यांचें स्वरूप राहील याविषयींचा कटाक्ष ठेवला पाहिजे. ( The essence of democratic society is not only the tolerating but the well-coming of differences which make for the enrichment of life.—M. C. ) असें करावयाचें म्हणजे अशा प्रकारच्या सर्व प्रचारावर विशिष्ट नियंत्रण राष्ट्रहिताच्या दृष्टीनें घातलें पाहिजे. नुसती कायद्याची सांवली त्यांच्यावर आहे एवढें पुरेसें नाहीं. कायदा गुन्ह्याला आळा घालतो तसा कित्येक प्रसंगीं प्रोत्साहनहि देतो हें पूर्वी नागपुरांतील दुचाकीचें उदाहरण घेऊन दाखविलेंच आहे. गुन्ह्याचें आणि शिक्षेचें स्वरूप आणि त्यांचें परस्पर प्रमाण काय असावें या कायदेशास्त्राच्या प्रश्नांत न शिरतां अनुभवाची गोष्ट म्हणून असें सहज सांगतां येईल कीं, मोठा हेतु साधण्याकरितां न्यायाच्या चक्रांत सांपडणें आणि शिक्षा भोगणें कार्यार्थी मनुष्य सहज पसंत करितो.

## घिसाडघाई नको

प्रचाराला असें मर्यादित करण्याबरोबरच जीवनाकडे पहाण्याचा राष्ट्रीय दृष्टिकोन त्यामध्यें प्रकट केला जाईल आणि त्याला धक्का लागेल असें त्यांत कांहीं असणार नाहीं अशीहि खबरदारी घेणें अवश्य आहे. परंतु या बाबतींत असा प्रश्न उत्पन्न होईल कीं भारतासारख्या विविधस्वरूपी प्रजेच्या निधर्मी राज्यसत्तेनें हा प्रश्न सोडवावाच कसा, परंतु हा प्रश्न बरोबर नाहीं. भारताचें सरकार निधर्मी असलें तरी त्या सरकारची प्रजा निधर्मी नाहीं आणि

सुदैवाची गोष्ट ही आहे कीं, निरनिराळ्या धर्मांत कितीहि फरक असला तरी जीवनाकडे पहाण्याचा त्यांचा दृष्टिकोन निश्चितपणें एक आहे. याविषयीं मागें दिग्दर्शन केलेंच आहे. म्हणून विस्तार न करितां एवढें म्हणतां येईल कीं, जीवन हें पावसाळी छत्र्यांसारखें नसून त्याला कांहीं आगापिछा आहे आणि म्हणून त्याची कांहीं जबाबदारीहि आहे, हें लक्षांत आणून दिलें पाहिजे आणि डॉ. लिंकनें दाखविलेली जी आपत्ति मागें उल्लेखिली आहे, तिची सदोषता नजरेंत भरेल असें त्याचें धोरण असलें पाहिजे. शिक्षणावरील निरनिराळ्या लिखाणांत ज्या एकीकरणाची तळमळ दाखविली जाते, तें एकीकरण कोणतेहि राष्ट्रघातक परिणाम न होतां या रीतीनेंच घडून येऊं शकतें. याच्या बरोबरीनेंच दुसरी कोणती काळजी घेणें आवश्यक असेल तर ती मागें उल्लेखिलेली सर्व प्रकारची घिसाडघाई, निदान शिक्षणांत तरी एकदम टाकून दिली पाहिजे. लोकशाही राष्ट्रांत सामान्य प्रजाजनाचा शैक्षणिक दर्जा उच्च असला पाहिजे व त्याकरितां राष्ट्रांतील निरपवाद सर्वांना मारून मुटकून का होईना पण सुशिक्षित बनविलें पाहिजे, याविषयीं आज तरी कोणाचें दुमत होणार नाहीं. परंतु त्या बाबतींत आज जें धोरण आहे तें मात्र एकंदरींत राष्ट्राला घातक ठरणारें आहे असें विचारान्तीं लक्षांत येईल. एका साध्या दृष्टान्तानें ही गोष्ट चांगली लक्षांत येईल.

## कापसाचें उदाहरण

सुमारें ४५ वर्षांपूर्वी वऱ्हाडामध्यें रोझिया कापसाच्या लागवडीची चळवळ जोरानें सुरू झाली. आणि सरकारनेंहि ती जणूं कांहीं हिरीरीनेंच उचलून धरली. तिचा प्रचार कशा रीतीनें करण्यांत आला आणि रोझिया, व्हेरम् वगैरे कापसाची पैदास होऊं लागली हें सर्वश्रुत आहे. त्यामुळेंच माझ्या मनांत एक जबरदस्त शंका आली. फार वर्षांपूर्वी ( सुमारें ३० वर्षांपूर्वी ) मॉडर्न रिव्ह्यूमध्यें अग्नेस्मेडले या रशियन लेखिकेनें 'The Role of India in World Politics' या नांवाचा एक सुंदर लेख लिहिला होता. त्यांत तिनें हिंदु लोकांना एक मोठें राजकीय सत्य शिकविलें होतें. इंग्रज लोक जी जी गोष्ट अथवा जी जी व्यक्ति उचलून धरतील ती अखेरीस तुमच्या राष्ट्राला विघातक आहे म्हणून समजावी आणि याच्या उलट ज्या गोष्टीविषयीं अथवा व्यक्तीविषयीं त्यांच्या मनांत द्वेषभाव असेल ती तुमच्या हिताची आहे असें समजावें

काहींशी अशीच कल्पना माझ्या डोक्यांत आली. माझे बंधु त्या वेळेस कमिशनरचे शिरस्तेदार होते. वऱ्हाडचा सर्व प्रकारचा कारभार त्यांच्या नजरेखालून जात होता. सरकारला रोझियाचा जो एवढा पुळका आला आहे त्यात काय गोम आहे म्हणून मीं त्यांना विचारलें. तेव्हां ते म्हणाले, 'सारा ढोंगाचा बाजार आहे बाबा, रोझियाच्या सद्यःफळांनीं लोकांना भुरळ पाडून वऱ्हाडचा लांब धाग्याचा कापूस बुडवावा हें पोटांतलें पाप आहे.'

## उदाहरणाचें स्पष्टीकरण

या दृष्टान्ताचा हेतु हा आहे कीं, हल्लींच्या घिसाडघाईचें स्वरूप पूर्णपणें लक्षांत यावें. वरील दृष्टान्ताच्याच भाषेंत बोलावयाचें म्हणजे हल्लींच्या घिसाडघाईनें जरी सुशिक्षिताची विपुल पैदास झालेली दिसली तरी त्याच्यांत लांब धागा देण्याची ताकद नसते. आणि लोकशाहीला कापूस विपुल पाहिजे असला तरी लांब धाग्याची किती आवश्यकता आहे हें सांगणें नकोच. तेव्हां तत्कालीन कांहीं फायदा झालेला हल्लींच्या पद्धतीनें जरी दिसला तरी अखेरीस राष्ट्रांतील तरुणांचाच कस सर्व तऱ्हेनें कमी झाल्यामुळें राष्ट्रघात निश्चित ठरलेला आहे. हल्लींच्या शिक्षणाची परिस्थिति अशी आहे कीं, त्या दृष्टीनें साऱ्या प्रजेची दोन वर्गांत फाळणी करण्यांत येईल. त्यांतील एक वर्ग—आणि याच वर्गांत देशांतील विशेषतः ब्राह्मण व ज्यांना पुढारलेले समजण्यांत येते असे कांहीं समाज—बुद्धि, धारणाशक्ति, ग्रहणशक्ति, सर्वंकषता इ. बाबतींत चांगलाच वरच्या दर्जाचा आहे, व त्यांची एकंदर रहाणीदेखील थोडी बाह्य परिस्थिति सुधारली तर शालेय शिक्षणास मदत करील अशीच आहे. याच्या उलट दुसऱ्या वर्गाची अवस्था आहे. अशा वेळीं या दोहोंना एकाच दावणींत बांधून शिक्षणाच्या चरकांतून ओढून काढण्याचा अट्टाहास केल्यानें खालचा वर्ग एकदम वरच्याच्या दर्जाला येईल ही गोष्ट असंभाव्य आहे. मानवेन्द्र रायांनीं म्हटल्याप्रमाणें वरचा वर्ग मात्र खालच्याला तावडतोब येऊन पोहोंचेल. आणि हीच गोष्ट किती झपाट्यानें घडत आहे हें आतांपर्यंत केलेल्या प्रतिपादनावरून लक्षांत येईल.

येथें एक गोष्ट राष्ट्रहिताच्या दृष्टीनें निर्भीडपणें लिहिणें भाग आहे. 'ब्राह्मण एक राष्ट्रीय प्रश्न' या माझ्या पुस्तकांत मीं असें म्हटलें आहे कीं, 'इंग्रजांच्या कारवाईनें 'वाघ्याचे पागे' बनलेल्या आमच्या लोकांनीं राज्यदान घेतलें पण इंग्रजांची अक्कल घेतली नाहीं.' (भाग १ ला, पृ. ५२) इंग्रजी राजवटीप्रमाणें

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे 90230

ब्रह्मद्वेषाचें नागडें प्रदर्शन जरी आज नसलें, तरी आजहि त्यांचें स्वरूप किती तीव्र आहे आणि जेथें खरोखर तें तीव्र नाहीं तेथें जातिभेदाच्या नांवाखालीं आणि जातिभेदानें राष्ट्रघात होतो असा घोष करीतच ब्रह्मद्वेष वाढवून प्रचारार्थ त्याचा सर्रास उपयोग कसा केला जातो याची जाणीव प्रत्येकाच्या अंतःकरणास आहे. माझ्या सदर पुस्तकांत मी त्याविषयीं निर्भीड समालोचन केलें आहे. अशी वस्तुस्थिति असल्यामुळें या बाबतींतील इंग्रजांचें धोरण आजहि जोमानें पुढें चालविलें जातें. आणि शिक्षणाच्या दृष्टीनें त्याचा दुष्परिणामहि ब्राह्मणवर्गावर अपेक्षेच्या बाहेर दिसून येतो. येथें मला ब्राह्मणाविषयीं कांहीं म्हणावयाचें नाहीं. राष्ट्राच्या हिशोबांत वर्ग या दृष्टीनें तो जगावयाचा असेल तर जगेल अथवा मरेल. पण शिक्षणाच्या दृष्टीनें या घटनेचा परिणाम राष्ट्रास अतिशय अनिष्ट असा झाल्याशिवाय रहाणार नाहीं हें वरील कापसाच्या दृष्टान्तानें स्पष्ट होईल.

## आतां ब्राह्मणाचें भय उरलेंच कुठें ?

पूर्वीची गोष्ट कांहींहि असो, परन्तु आतां लोकशाहींत तरी ब्राह्मणाचें भय कांहीं असण्याचें कारण नाहीं. डोईजड होईल म्हणून जें सांगितलें जातें तें केवळ प्रचारार्थ अथवा कांहीं तरी रीतीनें ब्राह्मण थोडा सुस्थितींत दिसत असतो म्हणून. आतां राष्ट्रांत लोकशाही आहे, प्रौढ मतदान आहे आणि राष्ट्रांतील कोणत्याहि राज्यांत ब्राह्मणांची संख्या आहे तरी किती ? त्याला जर कोणत्याहि रीतीनें वरचढपणा मिरवावयाचा असला तरी तो इतरांची मर्जी सांभाळूनच तो मिरवावा लागेल. बहुजन समाजानें बहुमतानें निवडून दिलें तरच तो अधिकारपदावर जाणार अशा स्थितींत त्याचें खरोखर भय उरलेंच कुठें ? तसें भय नसलें तरी त्यांच्यांत व इतरांत जो कांहीं थोडा फरक दिसून पडतो तोहि लोकशाहींत असूं नये म्हटलें तरी लोकशाहीच्या रगाड्यांत तो हळूहळू निघून जातच आहे. तेवढ्याकारितां शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रांत शिक्षणाचा दर्जा खालावून सबंध राष्ट्राचा घात करण्याचें काय कारण आहे ? आणि अशा प्रकारचे अनेक हेतुमूलक प्रचार राष्ट्रांत निर्वेधपणें अथवा निरनिराळ्या ढंगाखालीं चालू देण्यांत राष्ट्रदृष्ट्या तरुण पिढी तयार करण्यांत यश येण्याचा संभव आहे का अपयशाचाच संभव जास्त, हाहि मोठा प्रश्न आहे. सदर पुस्तकांत मी विजयानगरच्या प्रधानाची गोष्ट सांगून असें म्हटलें आहे कीं, ‘ ब्राह्मणपणानें

ब्राह्मण नष्ट करावयाचा असला तरी तो, त्याच्या बुद्धिमत्तेचा, ज्ञानाचा, कर्तगारीचा व साहसाचा उपयोग करून घेण्यांतच खरें मुत्सद्दीपण आहे. ' ( भाग १ ला, पृ. ५४ ) या सर्व धोरणाचा परिणाम शिक्षणावर काय झाला आहे याची साक्ष ऑस्ट्रेलियानें हिंदी विद्यार्थ्यांच्या नालायकीविषयींचा ठराव करून सुमारें सहा वर्षांपूर्वींच दिली आहे. सारांश, या बाबतींतहि धिसाडघाईचें धोरण टाकून देऊन ओघाओघानें होईल तेंच राष्ट्रास हितकारक होईल.

## माध्यमिक शिक्षणाचें महत्त्व

आतां या थोड्याशा लांबलेल्या लेखाचा थोडक्यांत समारोप करूं. आतांपर्यंत केलेल्या विवेचनावरून पूर्वींच्या व हल्लींच्या शैक्षणिक धोरणांत फरक कोठें आहे हें तेव्हांच लक्षांत येईल. माध्यमिक शिक्षण हें राष्ट्राचें पृष्ठवंश आहे. तें जोमदार पाहिजे, याविषयीं कोणाचेंच दुमत नाहीं. या शिक्षणाविषयींची पूर्वींची कल्पना अशी होती कीं, विद्यार्थ्यानें स्वतःचें व्यक्तित्व बनविण्याकरितां लागणारा मालमसाला कुटुंबांतून आणि भोंवतालच्या जगांतून मिळवावा. प्राथमिक शिक्षणानें त्याला साक्षर बनवावें आणि माध्यमिक शिक्षणानें त्याला जगांतील अनेक प्रकारची प्रौढशिक्षणें घेण्याची पात्रता यावी आणि त्यांचा सुयोग्य उपयोग करतां येईल अशा प्रकारची त्याच्या ज्ञान, कर्म आणि इच्छा या नैसर्गिक शक्तींची जोमदार वाढ व्हावी, असें होण्याकरितां त्याला जे सर्व प्रकारचें इतर संस्कार लागतात व जी माहिती लागते ती मात्र स्वतःच्या त्यानें प्रयत्नानें मिळवावी. ती त्यांच्यात कशी बशी कोंबण्याचा प्रयत्न केला जाऊं नये असें या शिक्षणाचें सर्व देशांतील धोरण होतें. आतां अर्थातच ही परिस्थिति जाऊन त्याच्या जागीं उलट परिस्थिति आली आहे. सुमारें बारा वर्षांपूर्वी मध्यप्रांत सरकारनें माध्यमिक शिक्षणाच्या सुधारणेकरितां बराच विचार केला होता. त्याची फलश्रुति मात्र कधीं घडून आलेली दिसली नाहीं ही गोष्ट वेगळी. परंतु आज माध्यमिक शिक्षणाचें ध्येय काय आहे हें त्यांनीं अगदी स्पष्ट शब्दांत सांगितलें आहे. राष्ट्राच्यापुढें जीं अनेक ध्येयें आहेत तीं साध्य करण्यास समर्थ असा नवमानवसमाज उत्पन्न करणें हें माध्यमिक शिक्षणाचें ध्येय आहे असें त्यांनीं म्हटलें आहे. ( Development of the pupil according to his abilities, capacities, and needs and to the creation of a new society

which will answer to the country's cherished ideals. सदर कमिटीचा अहवाल, उपोद्घात, पान ७ ) हल्लींच्या लोकशाहीचें एथवर जें वर्णन केलें आहे त्यावरून सहज लक्षांत येईल कीं, हीं देशाचीं उद्दिष्टें म्हणजे ज्या वर्गाच्या हातांत हल्लीं राज्यसूत्रें आहेत त्या वर्गाचींच उद्दिष्टें होत.

## आमूलाग्र बदल

ही गोष्ट साधण्याकरितां विचारसरणींत आमूलाग्र फरक झाले पाहिजेत. ( Copernican change ) असें त्यांनीं म्हटलें आहे, परन्तु तें सांगावयास नकोच. मागें वर्णन केलेल्या परिस्थितीवरून लक्षांत येईल कीं, असा आमूलाग्र बदल झालाच आहे. आपल्या देशांत काय आणि इतर देशांत काय, कुटुंब-संस्थेचा फायदा विद्यार्थ्यांना मिळेनासा झाला आहे, आणि बाहेरून मिळणारे संस्कार इतके विविध प्रकारचे आणि भिन्न भिन्न आहेत कीं, कोणत्याहि एका शिस्तीनें आपणहून ते संस्कार घेणें हें विद्यार्थ्यांस केवळ अशक्य आहे. आणि शास्त्रांच्या हल्लींच्या विचित्र अवस्थेमुळें मनुष्याची वृत्तीहि इतकी विचित्र झाली आहे कीं, पुनः तिच्यांत पंधरावें शतक डोकावूं लागलें आहे. ( We are faced, not merely with upward or menacing international situations but with a change in the temper and tempo of man's thinking with parallels that of the sixteenth century.—P. 19. The Hand-book of Social Studies by Jone Dray and David Jordon ) जो अनुभव इंग्रज मनुष्याला जगासंबंधीं येतो तोच थोड्या वेगळ्या प्रमाणावर भारतांतील निरनिराळ्या समाजांना आपआपासांत येत असेल असें समजण्यास हरकत नाहीं. विज्ञानशास्त्राच्या वाढीनें साऱ्या जगाचें आज जें संघटन होत आहे त्यामुळें थोडी अशी आपत्ति उत्पन्न झाली आहे. या निरनिराळ्या प्रवाहांत आपले तरुण वाहून न जातां आपल्याला इष्ट त्याच वळणांत कसे रहातील अशा प्रकारची शैक्षणिक योजना करणें कोणत्याहि सरकारला भाग आहे. ( A nation's politics are its philosophy in concrete form and a political system in order to maintain itself must evolve a suitable educational policy and practice.–Ground Work of Educational Theory by J. Ross. )

## मूलभूत प्रश्न

शिक्षणशास्त्राची सर्वमान्य तत्त्वें, अर्थव्यवस्था, साधनसामग्री व उपकरणें यांचा पुरवठा व इतर शिक्षणाच्या सोयी इ. शिक्षणाशीं संबंध असलेल्या अनेक बाबींच्यापेक्षां हा मूलभूत प्रश्नच जास्त बिकट झाला आहे. एकीकडून शालेय जीवनाचेंच कौटुंबिक जीवन बनवावयाचें आणि दुसरीकडून ज्या वातावरणांत तें वाढावयाचें तें वातावरण आपल्या कह्यांत ठेवावयाचें अथवा त्याचा परिणाम होणार नाहीं असें शालेय जीवनावर कांहीं कवच घालावयाचें असें या मूलभूत प्रश्नाचें मुख्य स्वरूप आहे. ह्या गोष्टी जर पुष्कळ अंशानें साध्य झाल्या तरच मुदलियार कमिशनसारख्या मंडळांनीं बहुमोल विचार करून ज्या कांहीं अनेक सूचना केल्या आहेत त्या सफल होण्याचा संभव आहे. आणि त्या गोष्टी थोड्या बहुत प्रमाणांत तरी साध्य व्हावयाच्या म्हणजे राष्ट्राच्या एकंदर धोरणांतच विचार-पूर्वक नीटनेटकेपणा आला पाहिजे. त्या दृष्टीनें जोंपर्यंत विचार होत नाहीं तो पर्यंतदेखील कांहीं ना कांहीं तरी यत्न केलेच पाहिजेत. म्हणून आज जो शिक्ष-णाचा खेळखंडोबा झाला आहे त्याचें यथार्थ स्वरूप लक्षांत आणून देण्याच्या उद्देशानें लिहिलेल्या या लेखाचा शेवट प्रत्यक्ष प्रयोगाच्या दृष्टीनें उपयुक्त अशा सूचना करून करावा असें वाटतें. हा लेख लिहितांना विशेषतः मला मुदलियर कमिशनचा रिपोर्टाचा फारच उपयोग झाला. म्हणून त्यांचे मनःपूर्वक आभार मानून इतरहि ज्या कुणाचें प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष साह्य झालें त्यांच्या ऋणाचा निर्देश करून पुढीलप्रमाणें कांहीं सूचना करितों.

## गटबाजी नको

प्रत्यक्ष प्रयोगासंबंधीं कांहीं सूचना करावयाच्या म्हणजे त्यांत शिक्ष-णाचें मानसशास्त्र आणि अर्थविचार हा आलाच. परंतु याविषयीं आतांपर्यंत झालेल्या निरनिराळ्या लिखाणांतून पुष्कळ बारीक व चांगला विचार झाला आहे, म्हणून त्यांत जास्त न शिरतां मुख्य मुद्दा तेवढा सागतों. मुदलियार कमिशननें म्हटल्याप्रमाणें भारताची लोकशाही यथार्थ लोकशाही व्हावयाची असेल तर अर्थातच तिच्या प्रत्येक समंजस घटकाला तिच्याशीं एकजीवता वाटली पाहिजे. आणि भारतासारख्या देशांत तसें वाटावयाचें म्हणजे आजपर्यंत उराशीं बाळगलेली सरूपता म्हणचे ऐक्य ही मूर्ख कल्पना सोडून दिली पाहिजे. आणि तिच्याबरोबरच एकत्र खाण्यापाण्याचीं सोंगें केल्यानें बंधुभाव उत्पन्न होतो हीहि

मिथ्या समजूत सोडून दिली पाहिजे. मधल्या चळवळीच्या काळांत काय वाटेल तें करावें लागलें. असो, अथवा हृदयपरिवर्तनानें साध्य होणारें एक अंतिम राष्ट्रीय ध्येय म्हणून त्याची आकांक्षा योग्य असो, हल्लींच्या काळीं त्याच गोष्टी-वर भर देऊन त्यांच्यासंबंधीं प्रामाणिक व शास्त्रीय श्रद्धा असणाऱ्यांची प्रचारार्थ टिंगल उडवून जें कांहीं होत आहे तें भारताच्या उदार घटनेस लाज आणणारें आणि व्यवहारास सोडूनहि आहे.

## गांधीजी अजाण होते काय ?

आज जर कॉंग्रेसचे पितामह गांधीजी असते तर त्यांनीं पुनः असें म्हणा-वयास कमी केलें नसतें कीं, एका शास्त्रीय ध्येयानें संयमाच्या तत्त्वावर जीवनाची उभारणी करणाऱ्या कुणालाहि रोटीबेटी व्यवहाराचे निर्बंध पाळणें आवश्यक आहे. ( That the prohibitions as to interdinning and intermarriages are necessary any scheme of life based on self restraint— Young India 17-11-27 ) राजकारणाच्या वावटळींत सापडून Young India मध्यें मांडलेलीं असलीं आपलीं मतें जरी त्यांनीं बाजूला ठेविलीं असलीं, तरी Young India त लिहितांना ते शुद्धीवर नव्हते अथवा अजाण होते असें समजणें शहाणपणाचें होईल असें वाटत नाहीं. निदान या सर्व प्रचाराचा आणि गटबाजीचा विद्यार्थी जीवनाशीं होतां होईल तों संबंध येणार नाहीं अशी व्यवस्था करणें आवश्यक आहे. शिक्षणक्षेत्रांतली तरी पक्षैकता कसोशीनें घालविली पाहिजे.

यावर कोणी असें म्हणेल कीं, लोकशाहीच्या मूलतत्त्वाशींच हें सारें म्हणणें विसंवादी आहे. लोकशाहीचा सारा जोम पक्षप्रवर्तन आणि पक्षसंघर्षांत आहे. आणि ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. रशियाचें एक हुकूमशाहीचें उदाहरण वगळलें तर फ्रान्स, अमेरिका, इंग्लंड इ. जीं पूर्ण लोकशाही अथवा प्रच्छन्न लोकशाही स्वरूपाचीं राष्ट्रें आहेत त्यांच्यांत काय पक्षोपपक्ष नाहींत ? अवश्य आहेत. परंतु त्यांचें चातुर्य हें आहे कीं, ते त्यांनीं शुद्ध राजकीय, आर्थिक, व्यापारिक क्षेत्रांतच मर्यादित ठेवले आहेत, राष्ट्रजीवनाची जी एकूण घडी बसलेली आहे तिच्याशीं त्यांचा संबंध मुळींच येऊं देत नाहींत. आला तरी तिच्यावर त्यांचा परिणाम होऊं देत नाहींत. आणि राष्ट्रांतील घटकांच्या भावना व अंतःकरणें दुखतील अशा कोणत्याहि गोष्टीशीं सरकारचा संबंध येऊं देत नाहींत.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम

## रेडियोवरदेखील गटबाजीच

भारतांतहि पक्षोपपक्ष अवश्य रहावेत, परंतु ते शुद्ध राजकीय स्वरूपाचे अथवा आर्थिक स्वरूपाचे असावेत. आज कायदेशीर रीतीनें दाखवितां येत नसले तरी विद्यार्थीजीवनाशीं संबंध नसलेल्या सर्व क्षेत्रांतून या दृष्टीनेंहि लोकशाहीच्या नांवाखालीं गटबाजी आणि इंग्रजी अमलांत परिचित असलेली ब्युरॉक्रसीच कशी आहे हें कुणाहि विचारवंताच्या अंतःकरणास सहजच प्रतीत होतें. नुसते रेडिओवर होणारे अनेक कार्यक्रम पाहिले तरी हें लक्षांत येईल. नुकतीच कोणीं तरी तक्रारहि केली होती कीं, देशामध्यें अनेक सुविद्य लोक असतां रेडिओचे कार्यक्रम विशेष धोरणानें ठराविक वर्गांतील लोकांकडेच देण्यांत येतात.

## सुशिक्षित स्त्रीचें एक दंभ

किंबहुना हा ठराविक वर्ग म्हणजेच सुशिक्षित वर्ग आणि सुशिक्षित वर्ग म्हणजेच पूर्वी सांगितलेला पाश्चात्य बुद्धीचा वर्ग असें समीकरण गृहीतच धरलें जातें. याला पुष्कळ अंशीं त्यांच्याहून अन्य विचारसरणी असलेल्या लोकांचें औदासिन्यच खरें कारण आहे हें खरें आहे. तरी पण अंतिम कल्याणाच्या दृष्टीनें हें समीकरण खोडून टाकण्याची आतां गरज आहे. कारण पूर्वी सांगितल्याप्रमाणें, राज्याच्या अधिकारतंत्रांत याच लोकांचा सर्वस्वीं भरणा असल्यामुळें साहजिकच शिक्षणक्षेत्रांतहि एक गटबाजी उत्पन्न झाली आहे आणि विशेषतः ती स्त्रियांच्या बाबतींत तर फारच ठळकपणें दिसून येते. साक्षरता म्हणजेच सुशिक्षितता आणि सुशिक्षितता म्हणजे सुसंस्कृता ही आजची समजूत किती अयथार्थ आहे हें मागें दिलेल्या हक्स्लेच्या उद्‌गारावरूनदेखील लक्षांत येईल. केवळ एखादी पदवी असली अगर चटकदार लिहितां आलें म्हणजे माणूस सुसंस्कृत असतोच असें नाहीं. मागें डॉ. लिंकचे उद्‌गार दिले आहेतच. ( The well-educated are as likely to be socially mal-adjusted as are the less educated ). स्त्रियांच्या बाबतींत तर आज आणखी असा एक दंभ झाला आहे कीं, ज्यांच्यावर शिक्षणाचा कांहीं छाप पडला आहे आणि तो त्या लिहिण्याच्या अथवा वाचण्याच्या मार्गानें प्रकट करूं शकतात. त्या स्वतःला खऱ्या सुसंस्कृत समजतात आणि त्यांच्या कोट्यवधि अशिक्षित परंतु खऱ्या अर्थानें सुसंस्कृत असलेल्या भगिनींच्या उद्धाराचा मक्ता आपल्याकडे आहे असा आव आणतात. वास्तविक त्यांना व्रतवैकल्यांसारख्या साध्या पर-

परांच्या मागीलहि शास्त्रीय तत्त्वाची तोंडओळखदेखील नसते. त्यांच्या समजुतीप्रमाणें इष्ट तें स्वरूप व्रतवैकल्यांना देण्याच्या प्रयत्नांत मूळ श्रद्धांचा आणि भावनांचा त्या किती उपमर्द करतात याचीहि त्यांना जाणीव नसते. हाच प्रकार उघड उघड पुरुष वर्गांत आहे. अशा गोष्टींतली शास्त्रीय बाजू जरी बाजूला ठेविली तरी व्यवहारदृष्ट्याहि त्यांची कांहीं उपयुक्तता असूं शकेल, इतकेंच नाहीं तर आवश्यकताहि आहे हें विचारांत घेण्यास त्यांना कांहीं कारणच नसतें. पृथ्वीच्या पाठीवर असे कांहीं प्रकार आहेतच.

## अजूनहि व्हिक्टोरिया युगांतच !

विसाव्या शतकानें शहाणें झालेले लोक आतां त्यांची उपयुक्तता पुनः समजूं लागले आहेत हें अजून व्हिक्टोरिया युगांत रेंगाळणाऱ्या आमच्याकडील पाश्चात्यांच्या मानसपुत्रांना समजणें कठीण. ॲल्डस हक्स्ले तर म्हणतो कीं, कदाचित् अशा गोष्टींत अज्ञानाचा अंश असूं शकेल परन्तु जगांत कैक लोक अशा धारणेचे आहेत कीं, सद्‌गुणाच्या आणि सदाचाराच्या व्याख्यानबाजीपेक्षां अशा गोष्टींमुळेंच ते जास्त सच्चरित्र रहातात. (Attachment to traditional ceremomials and belief in the magical efficacy of ritual may prevent men from attaining to enlightment; but, on the other hand, they may help such individuals as have neither the desire nor the capacity for enlightment to behave a little better than they otherwise would have done.—Ends and Means ).

## स्त्री-पुरुष गल्लत नको

या साऱ्या गोष्टी लक्षांत ठेवून शिक्षणाकडे प्रत्यक्ष वळावयाचें म्हणजे प्रथमतःच तीन गोष्टींचा विचार करावा लागतो. अगदीं प्राथमिक आणि विश्वविद्यालयीन शिक्षण सोडलें तर मधल्या शिक्षणांत स्त्री आणि पुरुष यांच्या शिक्षणाची गल्लत काढून टाकली पाहिजे. स्त्रियांच्या बाबतींत भारतीयांनीं बारीक विचार करून त्यांचे मुख्य दोन वर्ग केले आहेत. बहुसंख्य स्त्रिया ' स्त्रीप्रज्ञातर्हि कात्यायनी ' या वर्गांत पडणाऱ्याच असतात. त्यांच्यापुढेंहि आज कांहीं स्वतः उद्योग करून संसारभार उचलण्याचा प्रसंग येऊन पडला आहे. तरी ती आपत्ति आहे, स्वतः त्या अंतर्बाह्य स्त्रीप्रज्ञाच्याच असतात, हें लक्षांत ठेवून त्यांच्या

शिक्षणाची योजना विशेषतः केली पाहिजे. निदान कु. कर्नाटकी यांनीं सुचविल्याप्रमाणें कांहीं विषयांचा त्यांचा ताण तरी कमी केला पाहिजे. त्याप्रमाणेंच ज्यांना पुढें पुस्तकी विद्येवर पोट भरावयाचें नाहीं, अशा बहुसंख्यांच्या शिक्षणाची सोय वेगळी करून माध्यमिक शिक्षणाचा दर्जा खालावणार नाहीं, अशा योजना केल्या पाहिजेत. पण त्याबरोबरच विज्ञान आणि उद्यम यांच्यामागें लागण्याच्या भरांत आर्टस् कॉलेजचा दर्जा जो आज तुच्छ लेखण्यांत येतो तसें न होईल अशीहि काळजी घेतली पाहिजे. उद्यमाचीं विद्यालयें हीं राष्ट्राची क्रियाशक्ति असलीं आणि विज्ञानाचीं विद्यालयें हा राष्ट्राचा मेंदू असला तर आर्ट्‌सचीं विद्यालयें हें राष्ट्राचें हृदय आहे. राष्ट्र जगण्याकरितां विज्ञान व उद्यम यांची आवश्यकता आहे पण राष्ट्राचें राष्ट्रीयत्व अबाधित रहाण्याकरितां आर्ट्‌सची गरज आहे.

अपेक्षेच्या बाहेर अवचटपणें अस्तित्वांत आलेल्या भारताच्या लोकशाहीसारख्या राज्याचा भर संख्येवर ( quantity ) असतो हें उघड आहे. परंतु त्या मोहाला आळा न घालतां गुण ( quality ) परिमाणाकडे दुर्लक्ष केलें असतां काय होतें याचा गेल्या १९ वर्षांत पूर्ण अनुभव आहेच. पूर्वीच्या मध्यप्रांत सरकारनें माध्यमिक शिक्षणाचा जो फेरविचार केला त्यांत तर असें स्पष्ट म्हटलें आहे, कीं ज्यांत कोणताहि हेतु नाहीं आणि ज्यानें कोणतेंहि ध्येय साधावयाचें नाहीं असें शिक्षण म्हणजे हल्लींचें माध्यमिक शिक्षण. (The present scheme of secondary education has no aim and is not designed to serve any special purpose. ) आज असें म्हणण्याची पाळी आली आहे कीं, संस्थेच्या बाबतींत होणारी धिसाडघाई न आवरली आणि माध्यमिक शिक्षणाचा दर्जा उंच न केला तर थोड्याच काळांत राष्ट्रांचा फार अधःपात झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

## शिक्षणाचे टप्पे

या दृष्टीनें पाहिलें तर शिक्षणाचे चार टप्पे सुचवावेसे वाटतात. प्राथमिक शिक्षण, बेसिक शिक्षण इ. सर्व प्रकारांचा पहिला टप्पा घ्यावा. त्यांत राष्ट्राला साक्षर करणें व उपयुक्त अशा उत्पादक धंद्यांच्या दृष्टीनें मुलांची तयारी करणें, चारित्र्य आणि सद्‌गुण यांचें त्यांच्या ठिकाणीं बीजारोपण करणें, नागरिक या या दृष्टीनें त्यांचा दर्जा वाढविणें इ० गोष्टी साधाव्यात. त्यानंतरचा टप्पा पूर्वी

ज्यांना मिडल स्कूल म्हणत त्यांच्यासारखा असावा व त्यांत मुलाला जास्त सज्ञान करणें आणि सामाजिक शिक्षणाचा मुख्य हेतु जो जगाच्या धकाधकींत कुठेंहि पडला तर बिचकून जाणार नाहीं अशी त्याची तयारी करणें हा, तो साध्य करावा. तिसरा टप्पा माध्यमिक शिक्षणाचा असावा आणि त्याचा दर्जा ज्ञानाच्या दृष्टीनें चांगलाच वरचा असावा. सरकारनें आपल्या इच्छेप्रमाणें वाटेल त्या नागरिक वर्गांना शिक्षण घेण्यास हवी तेवढी आर्थिक मदत करावी परंतु माध्यमिक शाळेंतला प्रवेश अर्थबळावर अवलंबून नसावा, बुद्धि व विद्या या दृष्टींनें विशेष पात्रता असली पाहिजे. अशी व्यवस्था झाली म्हणजे विश्व-विद्यालयांचा दर्जा आपोआपच सुधारला जाईल.

## सरकारचें कर्तव्य

शाळांच्या सुधारणांकडे लक्ष द्यावयाचें म्हणजे दोन चार गोष्टी लक्षांत घ्याव्या लागतील. एक तर डॉ. कर्व्यांनीं आपल्या लेखांत सुचविल्याप्रमाणें सरकारनें शिक्षणाचा आर्थिक बोजा स्वत:वर घेतला पाहिजे आणि केवळ राजद्रोही अशा संस्थाशिवाय इतर सर्व शिक्षणसंस्थांवर समान दृष्टि ठेवली पाहिजे. अशा संस्थांचे मुख्य तीन प्रकार असूं शकतात. केवळ सरकारी, सरकारच्या आश्रया-खालील आणि स्वतंत्र बाण्याच्या राष्ट्रहितचिंतक. सरकारी व निमसरकारी यांच्या-वर सरकारचें नियंत्रण सहजच असतें. परंतु या तिसऱ्या प्रकारच्या संस्थेवरहि तें कांहीं थोडें असणें अवश्य आहे नाहीं तर आज ज्याप्रमाणें खासगी शाळांना धंद्याचें स्वरूप येऊं पहात आहे, कोणीं तरी चार लोकांनीं एकत्र यावें, स्वतः-ला आजीव सभासद म्हणुन अथवा संस्थापक म्हणून विशेष हक्क घ्यावेत, ज्यांना शिक्षणशास्त्राची पुसटदेखील ओळख नाहीं अथवा प्रत्यक्ष अनुभव नाहीं त्यांचें व्यवस्थापक मंडळ बनवून पोटाला लावलेल्या शिक्षकांना वाटेल त्या अपमानानें, अरेरावीनें आणि हुकूमशाहीनें वागविणें असा प्रसंग होतो. म्हणून त्या शाळेच्या शिक्षणांत हात न घालतां शिक्षकाचा दर्जा प्रतिष्ठित राहील व त्याच्या व्यवसायाला गुलामगिरीचें स्वरूप येणार नाहीं एवढ्यापुरतें सरकारचें लक्ष तिच्यावर असावें आणि त्याकरितां तिचें आस्तित्व सरकारच्या परवानगीवर अवलंबून असावें. या शाळांतून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा दर्जा, पुढील शिक्षण, नोकरी वगैरे सर्व दृष्टींनीं सरकारी शाळेबरोबर असावा. याशिवाय गुरुकुलासारख्या आश्रमसंस्था असूं शकतील. परंतु त्यांतून निघणारे विद्यार्थी

केवळ स्वतंत्र बाण्याचे असल्यामुळें पुढील चरितार्थाकरितांहि स्वावलंबनावरच अवलंबून रहातील त्यांचा विचार सरकारनें करूं नये, मान ठेवावा.

## ठराविक पुस्तकें नकोत

शिक्षकाची विशेष तयारी करण्याकरितां S. T.,B.C.,T. अशा सोयी आहेत. यांत शिक्षणशास्त्रोंचे पुस्तकी ज्ञान दिलें जातें, परन्तु हल्लींची एकंदर स्थिति पहातां शाळांची प्रत्यक्ष व्यवस्था ज्यांच्या हातांत असावयाची ते हेड-मास्तरदेखील जास्त वाकबगार असण्याची गरज आहे. तेव्हां त्यांच्याहिकरितां विचारपूर्वक कांहीं योजना होणें इष्ट वाटतें. परीक्षांवर फार भर देऊं नये असें आतां लक्षांत येऊं लागलें आहे व त्याकरितां परीक्षेच्या बरोबरीनेंच शालेय प्रगतीलाहि महत्त्व द्यावें अशी योजना आतां होत आहे. अशा योजनेंत मनुष्यस्वभावाला अनुसरून पक्षपात होण्याचा जास्त संभव आहे हें खरें आहे. परंतु तो नाहीं कुठें ? परीक्षापद्धति काय त्यांतून सुटली आहे ? चव्हाट्यावर आणतां आले नाहींत तरी तेथेंहि अनेक किळसवाणे प्रकार कसे असतात याची साक्ष मनोमन सर्वांना असते. या सर्व गोष्टींबरोबरच आणखीहि एका गोष्टीची काळजी घेतली पाहिजे. भाषेसारख्या विषयांत विषयज्ञानाची इयत्ता सरासरी ठरलेली असावी, प्रश्नहि त्या धोरणानेंच विचारण्यांत यावेत. ठराविक पुस्तकें नकोत. ठराविक पुस्तकें असलीं म्हणजे त्यांच्यावरील टिप्पणींचा ( Keys ) सुळसुळाट होतो. कित्येक लोकांना पोटाचा लहान मोठा उद्योग मिळतो हें खरें, परंतु कशाबशा टिप्पणी घोकून एकदां परीक्षा पदरांत पडली म्हणजे पुढचे पाठ आणि मागचें सपाट असा प्रकार होतो; परंतु अशा रीतीनें आवश्यक म्हणून म्हणा किंवा उपयुक्त म्हणून म्हणा जीं पुस्तकें नेमलीं जातील तीं पुस्तकें सरकारीरीत्या प्रसिद्ध करून फारच माफक दरानें विद्यार्थ्यांना मिळण्याची सोय होणें आवश्यक आहे,

## शालेय पुस्तकांचा धंदा

हल्लींच्या व्यवस्थेंत पाठ्य पुस्तक लिहिण्याचा एक धंदाच होऊन बसला आहे. त्यामुळें पुस्तकेंहि भिकार निघतात आणि कांहीं लोकांचीं पोटें भरत असलीं तरी पुस्तकांच्या किमती भरमसाट असल्यामुळें मुलाचें शिक्षण म्हणजे कुटुंबाला एक महान् संकट होऊन गेलें आहे. एकीकडून राष्ट्राला सुशिक्षित करण्याची कोण घाई झालेली आहे आणि दुसरीकडून शिक्षणाची आणि शिक्ष-

अनुक्रम वि: ....... ........
क्रमांक ....................... नों: दि: ..........


णाशीं संबंध असलेल्या प्रत्येक बाबीची महागाई पराकाष्ठेची. त्यामुळें आणि हल्लींच्या जातीयता नको म्हणत म्हणतच जातीयतेच्या बिजागऱ्यांवर हालणाऱ्या सर्व राजकीय व तदनुषंगिक चळवळी यांमुळें राष्ट्रांत तशीहि विषमता उत्पन्न झाली आहे. शिक्षणक्षेत्रांतील वर सांगिलेला आर्थिक ताण जनतेंतील एका वर्गाला मुळींच जाणवत नाहीं अथवा फार कमी जाणवतो पण दुसऱ्या वर्गाला 'भीक नको पण कुत्रा आंवर' म्हणण्याची वेळ आली आहे. सरकाराला जातीयता नाहींशी करावयाची आहे म्हणून एका वर्गाला शिक्षणाकरितां जातवारीनें मदत करण्यांत येते आणि दुसऱ्या वर्गाला पर्यायानें महागाईच्या अतिरेकामुळेंच शिक्षणापासून निवृत्त होण्यास भाग पडत आहे. पक्षप्रचाराला हें धोरण जरी योग्य असलें तरी मागें सांगितल्याप्रमाणें एकंदर राष्ट्रहिताला विघातक आहे हें सांगणें नकोच.

## शिक्षकाची पात्रता

तशीच शिक्षकांच्या बाबतींतहि एक सूचना करावीशी वाटते. प्राथमिक शिक्षणाचा दर्जा तिन्ही थरांत खालचा म्हणून तें कोणाकडेहि सोंपविणें इष्ट नाहीं. केवळ ठराविक परीक्षा पास झाला म्हणून शिक्षक नेमला जाऊं यये. तसे शिक्षक निरनिराळ्या धोरणांनीं नेमले जातात. त्यामुळें आज अशी प्रत्यक्ष अवस्था दिसून येते कीं, वाणी आणि लेखन यांच्या बाबतींत शिक्षणखात्याची अपेक्षा अशी असते कीं, सर्वतोपरी शुद्धतेवर कटाक्ष असावा. परंतु शिक्षकालाच जेथें शुद्ध उच्चार करतां येत नाहीं व लिहितां येत नाहीं तेथें विद्यार्थी काय रडणार ! हें माझें लिहिणें अतिशयोक्तीचें वाटल्यास कोणींहि शाळांतील मुलांच्या वह्यांवर नजर टाकून पहावी. आणि प्राथमिक शिक्षणच तर काय पण माध्यमिक शिक्षणांतील उच्च दर्जाच्या शिक्षकांना थोडें लिहिण्यास सांगून पहावें. वळणदार अक्षर असणें याला आज कांहीं अर्थच राहिला नाहीं. या गोष्टी दिसावयास फार लहान दिसतात परंतु असल्या बारीक बारीक गोष्टींनींच मनुष्याच्या स्वभावाची घडण होत असते.

याशिवाय प्रत्यक्ष शिक्षण देण्याच्या बाबतींत लहानमोठ्या अनेक गोष्टींचा विचार करावा लागतो. मुदलियार कमिशनसारख्या अनेकांनीं त्यासंबंधीं ज्या उपयुक्त सूचना केल्या आहेत त्यांचाहि फायदा घेणें आवश्य आहे.

थोडें म्हणतां म्हणतां अपेक्षेच्या बाहेर लिहावें लागलें आणि इतकेंहि करून

केवळ दिग्दर्शन करण्यापलीकडे आणि या एका विषयाशीं इतर किती विषयांचा संबंध आहे हें दाखविण्यापलीकडे जास्त कांहीं करतां आलें नाहीं.

### तात्पर्य —

सर्वांचें तात्पर्य हें कीं, भारतांतील लोकशाही समर्थ होण्याकरितां शिक्षणक्षेत्राची सुधारणा होणें अवश्य आहे. आणि शिक्षणक्षेत्रांत सुधारणा व्हावयाची असली तर मध्यप्रांतांतील बोर्डानें म्हटल्याप्रमाणें तद्विषयक साराच दृष्टिकोन आमूलाग्रच बदलला ( Copernican Change ) पाहिजे. या आमूलाग्र फरकाचीं तीन मुख्य सूत्रें थोडक्यांत सांगतां येतील. इंग्रजी राजवटीचें धोरण आजिबात झुगारून देणें, घिसाडघाई न करणें, जातीयतेच्या उच्चाटनाच्या निमित्तानें अनेक सोंगें बंद करून जातीयतेला यथार्थ मूठमाती देणें. स्वराज्य मिळून जवळ जवळ बारा वर्षें होत आलीं तरी अजूनहि भारताची स्थिति अतिशय शोचनीय आहे. अजूनहि वास्तविकरीत्या तो परतंत्रच आहे. अन्नाकरितां त्याला परदेशावर अवलंबून रहावें लागतें. पैशाकरितां त्याला परदेशावर अवलंबून रहावें लागतें. युद्धसामुग्रीकरितां त्याला परक्यावर अवलंबून रहावें लागतें. वैज्ञानिक ज्ञानाकरिता त्याला परदेशावर अवलंबून रहावें लागतें आणि शिक्षणासारख्या मनुष्याच्या व्यक्तित्वाशीं सर्वस्वीं संबंधी असलेल्या विषयांतहि जर तो परक्या बुद्धीवरच अवलंबून राहूं लागला तर त्याच्या त्या स्वराज्यांत अर्थच कोणता राहिला ? आणि त्या स्वराज्याचा आनंद तरी कसा मानावयाचा ?

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम २२५५८ वि: ...
क्रमांक ...२२५५८... नोंः दिः ३।३।५८

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. 90230
REFBK-0010230